महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन : मुंबईसह एकाच वेळी प्रसारित ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, जालना, नाशिक

मूल्य २/- रुपये

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

• संपादक : राकेश शंकर गोरे • वर्ष : १६ अंक : ३६ पृष्ठ : ८, मुंबई, मंगळवार ०२ डिसेंबर २०२५ ते सोमवार ०८ डिसेंबर २०२५ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

## संक्षिप्त



### “डिजिटल कंटेंट पाहण्यासाठी आधार कार्ड व्हेरिफिकेशन गरजेचे”- सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली :** डिजिटल कंटेंट तयार करणाऱ्या व्यक्ती आणि प्लॅटफॉर्म्सना त्यांच्या ऑनलाइन कंटेंटच्या अचूकतेसाठी आणि कायदेशीर बाबींसाठी जबाबदार धरण्यासाठी एक स्वायत्त संस्था स्थापन करावी, या बाजूने सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट मत व्यक्त केले. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने जोर देऊन सांगितले की, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे रक्षण करणे महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर, समाज, निष्पाप नागरिक आणि लहान मुलांचे कोणत्याही हानीपासून संरक्षण करणे हा त्यांचाही मूलभूत हक्क आहे. या दोन्ही मूलभूत अधिकारांमध्ये योग्य संतुलन राखणे गरजेचे आहे. ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरील अश्लील कंटेंट पाहण्यासाठी आधार कार्ड व्हेरिफिकेशन असणे गरजेचे आहे.

### १९ देशांच्या नागरिकांसाठी अमेरिकेचे दरवाजे बंद! – डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा



**वृत्तसंस्था :** अफगाणी नागरिकाने केलेल्या गोळीबारात सुरक्षा जवानाचा मृत्यू झाल्यामुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प प्रचंड संतापले आहेत. अफगाणिस्तानसह तिसऱ्या जगातील (अविकसित) १९ देशांच्या नागरिकांना अमेरिकेत कायमची प्रवेशबंदी करण्याचे संकेत अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आज दिले. लवकरच सरकार हा निर्णय घेईल, असे त्यांनी सांगितले. अमेरिकी राष्ट्राध्यक्षांचे निवासस्थान असलेल्या व्हाईट हाऊसजवळ नुकतीच गोळीबाराची घटना घडली. त्यात नॅशनल गार्डच्या जवानाचा मृत्यू झाला. त्यानंतर अमेरिका सरकारने स्थलांतरितांच्या कायम निवासी दर्जाचा (ग्रीन कार्डधारक) फेरआढावा घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार अमेरिकेत सध्या असलेल्या १९ देशांतील स्थलांतरितांची काटेकोर तपासणी केली जाणार आहे. तिसऱ्या जगातील देशांमध्ये अफगाणिस्तान, म्यानमार, बुरुंडी, चाड, काँगो, क्युबा, विषुववृत्तीय गिनी, इरिट्रिया, हैती, इराण, लाओस, लिबिया, सिएरा लिओन, सोमालिया, सुदान, टोगो, तुर्कमेनिस्तान, व्हेनेझुएला आणि येमेन यांचा समावेश आहे.

# अन्यथा संपूर्ण निवडणुका 'स्थगित' कराव्या लागल्या असत्या; निवडणुक आयोगाकडून स्पष्टीकरण

**मुंबई (विशाल कारंडे) :** राज्यातील २० पेक्षा जास्त नगरपालिकेच्या (Election) नगराध्यक्षपदांच्या निवडणुका पुढे ढकलल्या असून शेकडो प्रभागातील नगरसेवकपदाच्याही निवडणुका ऐनवेळी पुढे ढकलण्यात आल्या आहेत. त्यामुळे, बहुतांश कार्यकर्ते आणि स्थानिक नेत्यांची, उमेदवारांची घोर निराशा झाली आहे. निवडणुकीसाठी मतदानाच्या एक दिवस अगोदरच आयोगाने (Election commission) निवडणुका पुढे ढकलण्याचे निर्देश दिल्याने राज्यकर्त्यांनीही निराशा व्यक्त केली. तर, काँग्रेस नेते माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनीही संताप व्यक्त करत राज्य सरकारलाच जबाबदार धरले. त्यानंतर, आता राज्य निवडणूक आयोगाने याबाबत स्पष्टीकरण दिलं आहे.




सर्व बाजूंचा विचार करुन आणि कायदेशीर सल्ला घेऊनच काही निवडणुका पुढे ढकलल्या, असे राज्य निवडणूक आयोगाच्या सूत्रांकडून स्पष्टीकरण देण्यात आलं आहे. राज्यातील एकूण २४ नगरपालिका आणि दीडशे सदस्यांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्याने या निवडणुका २० डिसेंबरला होणार आहेत. मात्र, या निर्णयाचा सध्याच्या निवडणुकांवर परिणाम होणार नसल्याचे राज्य निवडणूक आयोगाचे म्हणणं आहे. १७ १(ब) तरतुदीनुसार उमेदवाराने कोर्टात अपील केल्यास उमेदवाराला अर्ज मागे घेण्यासाठी ठराविक वेळ देणं गरजेचं होतं. अन्यथा संपूर्ण निवडणुकीवर परिणाम झाला असता आणि निवडणुका स्थगित कराव्या लागल्या असत्या, त्यामुळे ठराविक निवडणुका पुढे ढकल्याची माहिती आयोगामधील सूत्रांकडून देण्यात आली आहे. ज्या निवडणुका पुढे ढकलल्या आहेत त्यांना पुरेसा वेळ नियम ‘क’ आणि ‘ड’ प्रमाणे देण्यात आला आहे आणि त्यानुसार पुढे ढकललेल्या निवडणुका २० डिसेंबर रोजी घेण्यात येत आहेत. राज्यातील २४ नगरपालिका मधील नगराध्यक्ष आणि १५० च्या जवळपास सदस्यांच्या प्रचार खर्चाचा निर्णय राज्य निवडणूक आयोगाने विचाराधीन ठेवला असून याबद्दल लवकरच निर्णय जाहीर केला जाईल. याबाबत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत आज बैठक पार पडली आहे. नगराध्यक्ष पदासाठी जनतेमधून नगराध्यक्ष निवडून येणार, त्यामुळे तिथे एकदाच मतदान होणार काही प्रभागांच्या निवडणुका पुढे ढकलल्यामुळे प्रभागातील निवडणुकांसाठी दुसऱ्यांदा मतदान कराव लागणार आहे. जिथे जिथे निवडणुका पुढे ढकलल्या आहेत त्या ठिकाणच्या २४ निवडणूक अधिकाऱ्यांना जिल्हाधिकाऱ्यांना मार्फत अहवाल सादर करण्यास सांगितला असून कारणे दाखवा नोटीस पाठवण्याची सूत्रांची माहिती आहे. पुढे ढकललेल्या निवडणुकांमध्ये नव्याने उमेदवाराला अर्ज भरता येणार नाही, फक्त अर्ज मागे घेता येणार आहे. चिन्ह वाटप आवश्यकतेनुसार होईल, असेही आयोगाने स्पष्ट केले आहे.

## पोलीस दलात प्रथमच! नवी मुंबईतील ३१ पोलीस युनिट्स ISO प्रमाणित

**नवी मुंबई (सचिन कदम) :** नवी मुंबई पोलिसांच्या सेवांची गुणवत्ता अधिक उंचावण्यासाठी आयुक्तालयाने मोठी झेप घेतली आहे. मंगळवारी आयोजित गुन्हे आढावा बैठकीदरम्यान आयुक्त मिलिंद भारंबे यांनी परिक्षेत्रातील २२ पोलीस ठाणे आणि ११ विविध शाखांना आयएसओ मानांकनाचे प्रमाणपत्र प्रदान करून सन्मानित केले. या मानांकनामागील मुख्य उद्दिष्ट म्हणजे नागरिकांना मिळणाऱ्या पोलीस सेवांमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे निकष लागू करणे, कामकाज अधिक पारदर्शक बनवणे आणि प्रत्येक स्तरावर विश्वासार्हता वाढवणे. सर्व शाखांमध्ये काम वेळेत, नियमबद्ध पद्धतीने आणि उच्च कार्यक्षमतेने पूर्ण व्हावे, तसेच प्रत्येक प्रक्रियेसाठी ठोस मानक कार्यप्रणाली लागू करणे, हे आयुक्तालयाने स्पष्ट केले आहे. नवी मुंबई पोलिसांनी याआधीच विविध विभागांतून सेवा सुधारणा, तक्रार निवारणाची गती, तसेच लोकसहभाग वाढवण्यासाठी अनेक उपक्रम राबवले आहेत. त्यात उणिवा दूर करण्यासाठी नव्या संकल्पना लागू



करण्यावरही भर देण्यात आला आहे. या सर्व प्रयत्नांचा परिपाक म्हणून एकूण ३१ विभागांना आयएसओ मानांकन मिळाले आहे. या प्रमाणित यादीत वाशी परिमंडळातील वाशी, एपीएमसी, रबाळे, कोपरखैरणे आणि रबाळे एमआयडीसी पोलीस ठाण्यांचा समावेश आहे. पनवेल परिमंडळात खारघर, तळोजा, कळंबोली, खांदेश्वर, कामोठे, पनवेल शहर आणि पनवेल तालुका पोलीस ठाण्यांना मानांकन मिळाले. तुर्भे परिमंडळातील तुर्भे एमआयडीसी, नेरूळ, एनआरआय, सीबीडी बेलापूर आणि सानपाडा पोलीस ठाणे यांचा समावेश आहे.

पान २ वर

## मुंबईकरांनो सावधान! प्रदूषणाचे नियम मोडल्यास आता खैर नाही

### पालिकेची २८ कलमी मार्गदर्शक तत्त्वे लागू

**मुंबई (नितीन देवळेकर) :** राजधानी दिल्लीनंतर आर्थिक राजधानी मुंबईची हवाही विषारी झाली आहे. मुंबईकरांना श्वसनाचा त्रास, घशांमध्ये खवखव यासारख्या समस्या जाणवत आहेत. मुंबईत होत असलेल्या वायू प्रदूषणामुळे मुंबईकारांना गुदमरल्यासारखे वाटत आहे. मुंबईतील हवेची गुणवत्ता अतिशय खराब निर्देशांकात गेली आहे. मुंबईमधील बहुतेक भागात हवा गुणवत्ता निर्देशांक (AQI) गंभीर पातळीवर पोहोचला आहे. त्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेने (BMC) शहरात GRAP-4 लागू केले आहे. प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी बीएमसीकडून मुंबईत



GRAP 4 निर्बंध लागू करण्यात आले आहेत. मुंबईतील अनेक भागातील हवेची गुणवत्ता खराब आणि अतिशय वाईट श्रेणींमध्ये घसरली आहे. या भागात मडगाव, देवनार, मालाड, बोरिवली पूर्व, चकाला-अंधेरी पूर्व, नेव्ही नगर, पवई आणि मुलुंड या भागाचा समावेश आहे. मुंबई महानगरातील वायू प्रदूषण आटोक्यात आणण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने २८ मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत.बांधकाम / प्रकल्प स्थळी वायू प्रदूषणास कारणीभूत ठरेल, असे कोणतेही कृत्य करू नये, असे बीएमसीने म्हटलेय. ज्या ठिकाणी हवेची पातळी अतिशय खराब झालेली आहे. त्या ठिकाणी बांधकाम थांबवण्याचे आदेश बीएमसीने दिले आहेत. बांधकामांमुळे निर्माण होणाऱ्या धुळीमुळे शहरातील वायू प्रदूषण वाढत आहे. परिणामी बीएमसीने ५० हून अधिक बांधकाम स्थळे थांबवण्याच्या आणि बंद करण्याच्या नोटिसा बजावल्या आहेत.

पान २ वर

## ‘या’ कारणामुळे महाराष्ट्रातील २० नेते निवडणूक आयोगाच्या रडावर

**मुंबई (सम्यक कासारे) :** राज्यात स्थानिक स्वराज्य निवडणुकांची रणधुमाळी सुरु आहे. प्रचाराचा जोर वाढला आहे. यामुळे ऐन थंडीत महाराष्ट्राचे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. प्रचारादरम्यान, राजकीय नेत्यांची वादग्रस्त वक्तव्य चर्चेत आली आहेत. प्रचारादरम्यान अनेक नेत्यांनी प्रलोभने देणारी वक्तव्य केली आहेत. यामुळे एकनाथ शिंदे, अजित पवार, चित्रा वाघ, गुलाबराव पाटील यांच्यासह महाराष्ट्रातील २० नेते निवडणूक आयोगाच्या रडावर आले आहेत. एकनाथ शिंदे, अजित पवार, गुलाबराव पाटील, संजय शिरसाट, जयकुमार गोरे, चित्रा वाघ यांना प्रलोभने देणारी वक्तव्य भोवणार आहेत. राज्यातील प्रचाराच्या रणधुमाळीत प्रलोभने देणाऱ्या २० नेत्यांच्या वक्तव्यांची निवडणूक आयोगाकडून




दखल घेतली जाणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने ज्या ठिकाणी संबंधित नेत्यांनी वक्तव्य केली आहेत त्या ठिकाणच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून तत्काळ अहवाल मागवला आहे. निधीला कात्री लावण्याचे वक्तव्य अजित पवार यांनी केले. गुलाबराव पाटील यांच्याकडून लक्ष्मी दर्शन होणार असल्याचं वक्तव्य करण्यात आले. एकनाथ शिंदे यांच्याकडून तिजोरीच्या चाव्या, चित्रा वाघ यांच्याकडून खा कुणाचं पण मटण मात्र दाबा कमळाचं बटण अशी वक्तव्य करण्यात आलीय. अशा प्रकारची वक्तव्य करणाऱ्यांचा अहवाल निवडणूक आयोगाने मागवला आहे. आता हा अहवाल मिळाल्यानंतर निवडणूक आयोग काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महालक्ष्मीला कुठे बसायचं कळतयं, महालक्ष्मी कमळावर बसली आहे,त्यामुळे कमळावर बसून लक्ष्मी आपल्या घरात येणार आहे,असं विधान पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी केला आहे.त्या सांगलीच्या जत मध्ये भाजपा उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित सभेमध्ये बोलत होत्या,त्या सभेला भाजपा आमदार गोपीचंद पडळकर यांच्यासह जत नगरपरिषदेतील उमेदवार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### केंद्र सरकारचा मोठा निर्णय

## प्रिस्क्रिप्शनशिवाय कफ सिरप विक्रीला बंदी

**नवी दिल्ली (प्रगती शर्मा) :** कफ सिरप घेतल्याने अनेक बालकांचा मृत्यू झाल्याचे प्रकरण काही दिवसांपूर्वीच समोर आले होते. त्यानंतर कफ सिपरचा मुद्दा चर्चेत आला होता. असे असताना आता अनेक बालमृत्यू आणि कफ सिरपमुळे होणाऱ्या दुष्परिणामांच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय आता कफ सिरप मिळणार नाही. कफ सिरपच्या मनमानी विक्रीला आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्यात आल्या आहेत. सध्या बहुतेक कफ सिरप डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय औषध दुकानांमध्ये विकले जात असल्याचे समोर आले आहे. मात्र, आता असे करता येणार नाही. औषध विक्रेत्यांना आता प्रत्येक प्रिस्क्रिप्शनची नोंद ठेवणे आवश्यक असेल. शिवाय, कफ सिरपच्या गुणवत्तेबाबत कठोर नियम आवश्यक असतील. औषध सल्लागार समितीच्या मंजुरीनंतर नियम कडक



करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सरकारच्या सर्वोच्च नियामक असलेल्या औषध सल्लागार समितीने कफ सिरपचा समावेश काढून टाकण्यास मान्यता दिली आहे. आता कफ सिरप खरेदी करताना डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शन अनिवार्य असणार आहे. गेल्या तीन वर्षांत भारतातून निर्यात केलेल्या अनेक कफ सिरपमध्ये डायथिलीन ग्लायकॉल (DEG) आणि इथिलीन ग्लायकॉल (EG) सारखी हानिकारक रसायने आढळल्याने हा प्रस्ताव मांडण्यात आला होता.

पान २ वर

## मुंबईत आता ४०x४० फुटांपेक्षा मोठ्या होर्डिंग्जवर बंदी!

### मनपाचा कठोर निर्णय!

**मुंबई (राकेश गायकवाड) :** मुंबई महानगरपालिका क्षेत्रात जाहिरातींसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने (BMC) नवीन जाहिरात फलक (होर्डिंग) धोरण २०२५ जारी केले आहे. या नवीन धोरणानुसार, आता ४०x४० फुटांपेक्षा मोठ्या आकाराचे होर्डिंग्ज लावता येणार नाहीत. जांच समितीच्या शिफारशीनंतर बीएमसीने या नवीन धोरणाची घोषणा केली आहे. या नवीन नियमांनुसार, भविष्यात अपघात घडण्यास कारणीभूत ठरू शकणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या जाहिरातींना आता परवानगी दिली जाणार नाही. मॉल्स, मल्टीप्लेक्स, शॉपिंग कॉम्प्लेक्स, व्यावसायिक इमारती (Commercial Buildings) आणि पेट्रोल पंपांवर एलईडी (LED) जाहिरात फलक प्रदर्शित करता



येतील. निर्माणाधीन (Under Construction) किंवा दुरुस्तीचे काम चालू असलेल्या इमारतींच्या कंपाऊंड वॉल आणि इमारतींच्या बाहेरील भागावर व्यावसायिक आणि अव्यावसायिक दोन्ही प्रकारच्या जाहिराती प्रदर्शित करता येतील. दरम्यान, १३ मे २०२४ रोजी घाटकोपर येथे १२० स्क्वेअर फूट आकाराचे एक भलेमोठे होर्डिंग कोसळले होते.

पान २ वर

## यापुढे आधार कार्ड हा जन्मतारखेचा पुरावा नाही! – फडणवीस सरकारचा निर्णय

**मुंबई (प्रथमेश चव्हाण) :** आधार कार्ड हा जन्मतारखेचा पुरावा म्हणून स्वीकारणे बंद करण्याचा महत्त्वाचा निर्णय महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश राज्य सरकारने घेतला आहे. बनावट जन्म आणि मृत्यू प्रमाणपत्रे रोखण्यासाठी आणि बेकायदेशीर कामांना आळा घालण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने हा निर्णय घेतला आहे. यामुळे आधार कार्डावर आधारित तयार केलेली सर्व विलंबित जन्म प्रमाणपत्रे रद्द केली जातील आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल. उत्तर प्रदेशच्या नियोजन विभागाने




स्पष्ट केले आहे की, आधार कार्डाला कोणतेही जन्म प्रमाणपत्र जोडलेले नसते, त्यामुळे ते जन्माचा दाखला म्हणून ग्राह्य धरले जाऊ शकत नाही. विशेष सचिव अमित सिंग बन्सल यांनी सर्व विभागांना यासंबंधी सूचना जारी केल्या आहेत. महाराष्ट्र सरकारनेही असाच निर्णय घेतला आहे. राज्य महसूल विभागाने दिलेल्या सूचनेनुसार, जन्म आणि मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ नंतर आधार कार्डाचा वापर करून तयार केलेली सर्व जन्म प्रमाणपत्रे रद्द केली जातील. महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांनी आधार कार्डाचा वापर करून जारी केलेल्या संशयास्पद प्रमाणपत्रांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे बनावट प्रमाणपत्रे वापरून होणारे गैरप्रकार थांबतील.

पान २ वर

संपादकीय

संपादक : राकेश शंकर गोरे



# घराणेशाहीची महिला आरक्षणातही साठमारी !

मागास समाज घटकांना मिळालेले एकूणच सामाजिक-सांस्कृतिक आरक्षण व ऐतिहासिक वंचिततेसाठी आहे, वैयक्तिक जातीय ओळखीसाठी नाही. ज्यांना कधीच सत्ता मिळालेली नाही, अशा समाज घटकांना संधी देण्यासाठी राजकीय आरक्षणाची व्यवस्था आहे. महिलांना मिळालेल्या आरक्षणाचा हेतू आर्थिक, शैक्षणिक, सामाजिकदृष्ट्या मागे असलेल्या समूहांना राजकीय प्रतिनिधित्व देणे हा आहे. महिला आरक्षणाचा हेतू मूळ वंचित गटांत महिलांचे नेतृत्व घडवणे, तसेच या वर्गातील महिलांच्या माध्यमातून त्या समाज घटकाला प्रतिनिधित्व मिळावे हा आहे. हे आरक्षण त्या महिलांना वैयक्तिक मिळालेले नसून, त्या विशिष्ट मागासवर्गीय समाजाचे प्रतिनिधित्व करतात म्हणून मिळाले आहे. संविधानामुळे मागास महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांत मिळालेल्या राजकीय आरक्षणात महाराष्ट्रात आणि देशातील विविध राज्यांत पुढारलेल्या काही जाती साठमारी करताना दिसतात. राज्यातील काही ठिकाणी मागासवर्गीय महिलांसाठी आरक्षित असलेल्या जागांवर उच्च जात वर्गात विवाह झालेल्या मागास महिलांना राजकीय आरक्षणाच्या जागांवर सर्वच प्रमुख राजकीय पक्षांकडून संधी दिली जात आहे. दलित, आदिवासी आणि इतर मागासवर्गीयांना असलेले राजकीय आरक्षण 'मागासवर्गीय सुनांच्या माध्यमातून आपल्याच घरात किंबहुना आपल्याच जातीत असावे, हा या मागचा मुख्य उद्देश शेकडो वर्षांपासून सत्ताधारी असणाऱ्या जातींचा असतो. अनेक वर्ष सत्ताधारी असलेल्या जातींची अशा प्रकारची भूमिका मागास महिलांच्या राजकीय आरक्षणाचा खरा उद्देश साध्य करेल काय ? की मागास पुरुषांसाठी दिलेल्या राजकीय आरक्षणाप्रमाणेच हे आरक्षणदेखील कालांतराने कूचकामी ठरेल? याची चर्चा फुले-शाहू-आंबेडकरांचे सतत नाव घेणाऱ्या राज्यात होणे आवश्यक आहे. निवडणुकांमध्ये असे दिसते की ज्या मागासवर्गीय महिलांचे विवाह उच्च समजल्या जाणाऱ्या जातीत झालेले आहेत, अशा घरांतील आर्थिक-राजकीयदृष्ट्या मजबूत कुटुंबे त्या महिलेच्या 'मागासवर्गीय' या कायदेशीर पात्रतेचा उपयोग करून आरक्षित जागेतून तिला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीला उभे करतात. असे केले जाण्याचे प्रमाण लक्षणीय आहे. हा प्रकार राजकीय आरक्षणाच्या मूळ उद्देशाला मागे टाकणारा आहे. सत्ताधारी जाती या महिलांना फक्त सत्ता मिळविण्यासाठी निवडणुकीच्या मैदानात आणत आहेत, ज्यामुळे सामाजिक न्यायाच्या तत्त्वाला बाधा निर्माण होत आहे. राजकीय पक्षांचा दृष्टिकोन 'सामाजिक न्याय' पेक्षा राजकीय लाभ घेण्याचा असतो. त्यांना जिंकणारा चेहरा किंवा समीकरण हवे असते. अशा राजकीय पक्षांना आणि त्या पक्षाच्या माध्यमातून स्वजातीय सत्तेला टिकवून ठेवण्यासाठी त्यांना मागासवर्गीय महिलेची जातीय ओळख कायदेशीर पात्रता देते; तर तिच्या सासरच्या जातीची आणि घरातील आर्थिक-सामाजिक ताकद निवडणूक यंत्रणा राबवण्यासाठी बळ मिळवून देते. परिणामी मूळ वंचित गटांतील खऱ्या नेतृत्वाला संधी मिळत नाही. विवाहाने मागासवर्गीय महिलांची जात बदलत नसली तरी त्या स्त्रीची वास्तविक सामाजिक सत्ता आणि संधीची समानता यातील स्थिती सुधारते. यावर कायद्याने फार नियंत्रण नसले, तरी याचे सामाजिक परिणाम मोठे आहेत. याने मूळ मागासवर्गीय राजकीय नेतृत्वाचा आवाज कमकुवत होण्याची शक्यता आहे. मुळातच सामाजात प्रभावी असलेल्या कुटुंबातील महिला जेव्हा आरक्षित जागेवर उभ्या राहतात, तेव्हा त्यांच्या प्राधान्यक्रमांमध्ये जमिनीचे प्रश्न, आरोग्य, शिक्षणातील मागासलेपणा, अत्याचार भेदभाव, वन अधिकार यांसारखे तळागाळातील दलित- आदिवासींच्या हक्कांचे विषय प्रामुख्याने राहत नाहीत. याने आरक्षणाला अपेक्षित असणारा तळागाळातील समाजाच्या प्रतिनिधित्वाचा लाभ नाहीसा होतो. समाजात सुरू असलेला हा प्रकार ओळखपात्रता विरुद्ध उद्देशपूर्ण प्रतिनिधित्व याच्यातला संघर्ष आहे. कायद्याने त्या महिला मागासवर्गीय आहेत. पण सामाजिक न्यायाच्या दृष्टीने विचार केल्यास राजकीय आरक्षणाचा हेतू मूळ वंचित गटांचे नेतृत्व घडवणे हा आहे. आणि जेव्हा शक्तिशाली घराणी त्या जागा ताब्यात घेतात, तेव्हा हा हेतू बाजूला पडतो. हे 'रिप्रेझेंटेशन कॅप्चर' किंवा 'एलिट कॅप्चर'चे उदाहरण आहे. मागासवर्गीय आरक्षणाचा हेतू मूळ समुदायातून नेतृत्व तयार करणे हा आहे. विवाहानंतर सामाजिकदृष्ट्या शक्तिशाली घरात गेलेल्या महिलांना पैसा, पक्षाची यंत्रणा, सामाजिक पाठिंबा मिळतो आणि त्या जिंकतात. त्यामुळे खऱ्या मागासवर्गीय नेतृत्वाचा आवाज दाबला जातो. महाराष्ट्रातील प्रदेश आणि जिल्हानिहाय दिसणारे पॅटर्न अगदी स्पष्ट आहेत. खानदेशातील जळगाव, धुळे, नंदुरबार, नाशिक - हा आदिवासीबहुल पट्टा आहे. या भागात बऱ्याच ठिकाणी आरक्षण असूनदेखील आरक्षित जागेवरील सत्ता गैरआदिवासी राजकीय सत्ताधारी जाती आणि घराण्यांच्या हातात आहे. येथे आदिवासींसाठी आरक्षित काही जागा आदिवासी पुरुष आणि महिला नेत्यांच्या जागी त्यांच्या राजकीयदृष्ट्या प्रभावी गैरआदिवासी कुटुंबांच्या आदिवासी सुनांच्या हाती गेल्या आहेत. या महिला जातीनुसार अनुसूचित जमातीच्या असतात, पण सासरकडची सामाजिक रचना आणि आर्थिकदृष्ट्या बलाढ्य स्थिती त्यांना सामान्य आदिवासींच्या पुढे नेऊन ठेवते.

# मानवमुक्तीचा दीर्घ संघर्ष: आंतरराष्ट्रीय गुलामगिरी निर्मूलन दिनाचे समाजशास्त्रीय महत्त्व

**दि. २ डिसेंबर हा दिवस मानवसभ्यतेच्या इतिहासातील सर्वात काळ्या अध्यायाला आणि त्यावरील संघर्षाला उजाळा देणारा दिवस आहे. "आंतरराष्ट्रीय गुलामगिरी निर्मूलन दिन" हा केवळ एक स्मरणदिन नाही, तर आजही जगभर वेगवेगळ्या स्वरूपात जिवंत असलेल्या आधुनिक गुलामगिरीविरोधातील लढ्याचे प्रतीक आहे. इतिहासाच्या पानावर गुलामगिरी जणू काही भूतकाळातील घटना आहे असे आपल्याला वाटत असले तरी वास्तविकता अतिशय कठोर आहे.**

आजही जगात लाखो लोक अद्याप गुलामगिरीच्या अंधाऱ्या चक्रात अडकलेले आहेत. मानव सभ्यतेने विज्ञान, शिक्षण, तंत्रज्ञान व लोकशाही सरकारव्यवस्था यांसारख्या क्षेत्रांत अमाप प्रगती केली आहे, परंतु मानवाधिकार, मानवी प्रतिष्ठा आणि समानतेच्या दृष्टिकोनातून पाहता गुलामगिरीचे अनेक स्वरूप आजही समाजाच्या पृष्ठभागाखाली धुमसत आहेत. इतिहासात गुलामगिरी ही केवळ आर्थिक मालकीची व्यवस्था नव्हती, तर सत्ता, वर्ण, धर्म, जात, भौगोलिक वंश आणि सामाजिक वर्चस्व यांच्या आधारावर उभी केलेली एक अमानवी संघटना होती. प्राचीन इजिप्त, रोम, ग्रीस, बाबिलोनिया किंवा भारतातील सामंतशाही काळातील शूद्र व दलितांवरील वागणूक असो यामध्ये सर्वत्र गुलामगिरीचे स्वरूप दिसून आले आहे. परंतु मध्ययुगीन वसाहतवादाने या व्यवस्थेला अधिक क्रूर रूप दिले. विशेषतः आफ्रिकन लोकांना पकडून अमेरिकन देशांत विकण्याची मानवी तस्करी ही इतिहासातील सर्वात क्रूर आणि अमानवी आर्थिक व्यवस्था होती. लाखो लोकांना जबरदस्तीने जहाजांत भरून गुलाम म्हणून विकले गेले, त्यांच्या कुटुंबांना विभक्त केले गेले, त्यांची ओळख, भाषा, संस्कृती, तसेच मानवी अस्तित्वच हिरावून घेतले गेले. मानवाला पशूपेक्षाही कनिष्ठ गणले गेले. आज आफ्रिकन-अमेरिकन समाजात दिसणारे जातीय विभाजन आणि सामाजिक विषमता हा त्या वसाहतवादी गुलामगिरीचा दाहक परिणाम आहे. गुलामगिरीविरोधी चळवळीने जगभरात मानवाधिकारांची आणि सामाजिक समानतेची नवी लाट निर्माण केली. १९व्या शतकात ब्रिटन, फ्रान्स आणि अमेरिकेसह अनेक राष्ट्रांनी गुलामगिरीविरोधात कायदे केले आणि अखेर संयुक्त राष्ट्रांनी २ डिसेंबर १९४९ रोजी 'Forced Labour Convention' ला मान्यता देऊन गुलामगिरी निर्मूलन करून जागतिक लढा औपचारिक केला. १९८५ पासून ही तारीख "आंतरराष्ट्रीय गुलामगिरी निर्मूलन दिन" म्हणून साजरी केली जात आहे. हा दिवस मानवजातीच्या इतिहासातील एक जागृतीचे प्रतीक ठरतो, जो सांगतो की मानवी स्वातंत्र्य हे कोणत्याही राष्ट्राचे नव्हे तर संपूर्ण मानवजातीचे मूलभूत अस्तित्व आहे. परंतु आजही खऱ्या अर्थाने गुलामगिरी नष्ट झालेली नाही. संयुक्त राष्ट्रांच्या ताज्या अहवालानुसार जगात अद्याप ५० ते ५५ दशलक्ष लोक आधुनिक गुलामगिरीचे बळी आहेत. ही गुलामगिरी रूप बदलून समाजात खोलवर रुजलेली आहे. आज गुलामगिरीचे आधुनिक स्वरूप अधिक गुंतागुंतीचे, अदृश्य आणि तंत्रज्ञानाच्या आधारे सक्रिय आहे. मानव तस्करी, बालमजुरी, सक्तीची मजदुरी (Bonded Labour), जबरदस्तीचे विवाह, लैंगिक गुलामगिरी, अवयव व्यापार, सायबर सेक्स ट्रॅफिकिंग, ऑनलाइन पेड चाइल्ड अब्यूज, घरगुती नोकरांचे शोषण, स्थलांतरित कामगारांचे आर्थिक गुलामीकरण या सर्व आधुनिक गुलामगिरीच्या व्याख्या आहेत. विशेषतः महिला आणि मुली या गुलामगिरीचे सर्वात मोठे बळी आहेत. बालविवाह, हुंडा, आर्थिक अवलंबित्व, शिक्षणापासून वंचितता आणि लैंगिक शोषणामुळे त्यांना गुलामगिरीच्या दलदलीतून बाहेर येणे कठीण होते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर गुलामगिरी ही केवळ व्यक्तीगत हिंसाचाराची घटना नाही; तर ती संरचनात्मक हिंसा आहे. समाजातील वर्ग, वर्ण, जात, लिंग आणि सत्ता यांच्या विषमतेतून गुलामगिरी जन्म घेते. समाज जर असमान, अन्यायकारक आणि सत्ताकेंद्रित असेल तर गुलामगिरी आपोआप वाढीस लागते. भारताच्या संदर्भात पाहिले तर गुलामगिरीचे स्वरूप ऐतिहासिकदृष्ट्या जातिव्यवस्थेच्या आधारावर रचले गेले. दलित, भटके विमुक्त समाज, आदिवासी आणि आर्थिकदृष्ट्या वंचित समुदायांवर शतकानुशतके स्वयंपूर्णतेचा अधिकार हिरावून घेतला गेला. आजही भारतात बंधकाम मजूर, ईंटभट्ट्या, कारखाने, शेती, मत्स्यउद्योग आणि बांधकाम क्षेत्रात लाखो लोक आधुनिक गुलामगिरीचे बळी आहेत. भवानी मंडईतील कर्जावर काम करणारे शेतमजूर, घरकामगार, देवदासी प्रथा, तस्करीला बळी पडलेल्या महिला आणि मुली, तसेच बालमजुरीमध्ये अडकलेली मुलं ही उदाहरण या समस्येची गंभीरता दर्शवतात. जागतिकीकरण आणि भांडवलशाहीने श्रमबाजाराला अधिक असुरक्षित केले आहे. मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या स्वस्त मजुरीच्या शोधात गरीब देशांतील लोकांना शोषतात. त्यामुळे "Consumption-based slavery economy" हा शब्द आज वापरला जातो, ज्याचा अर्थ असा की ग्राहकांनी वापरलेल्या वस्तूंच्या निर्मितीत गुलामांचं श्रम सामील असतं. फॅशन उद्योगातील "Fast Fashion", खनिज उत्खनन उद्योग, साखर, चहा, कोको, हिरे आणि इलेक्ट्रॉनिक उद्योगाच्या उत्पादन प्रक्रियेत मानवाधिकारांचे उल्लंघन सर्वाधिक आढळते. या परिस्थितीत माध्यमं, शिक्षण, कायदे आणि मानवी हक्क चळवळींची भूमिका महत्त्वाची ठरते. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO), Amnesty International, UN Human Rights Office of the High Commissioner, Anti-Slavery International, Free the Slaves सारख्या अनेक संस्थांनी आधुनिक गुलामगिरीविरोधात लढा पुकारला आहे. अनेक देशांनी कठोर कायदे केले परंतु कायद्यापेक्षा सामाजिक जागृतीची कमतरता ही या समस्येचे महत्त्वाचे कारण आहे. "गुलामगिरी" या शब्दात केवळ बळजबरी, हिंसा, शोषण एवढाच अर्थ नाही, तर त्यात मानवी प्रतिष्ठेचा पूर्ण नाश दडलेला आहे. समाजशास्त्रातील विचारवंत कार्ल मार्क्स गुलामगिरीला आर्थिक शोषणाचे सर्वोच्च स्वरूप मानतात, तर मॅक्स वेबर यांच्या मते ती सत्ता आणि सामाजिक वर्चस्वाचा सर्वात गुंतागुंतीचा चेहरा आहे. अमर्त्य सेन यांचे मानव-विकास मॉडेल सांगते की स्वातंत्र्य, निवड आणि संधी हे मानवाला उपलब्ध करणेच खरी विकास प्रक्रिया आहे; आणि जिथे गुलामगिरी आहे तिथे विकास असूच शकत नाही. २१व्या शतकात गुलामगिरी निर्मूलनाची दिशा ही केवळ कायदेशीर कारवाई नसून ती मानवी संवेदनशीलता, शिक्षण, सामाजिक मूल्यव्यवस्था व आर्थिक समतेचा बदल असायला हवा. आपण समाजाच्या पटलावर असे वातावरण निर्माण केल्याशिवाय गुलामगिरी नष्ट होणार नाही जिथे प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या श्रमाचे, स्वातंत्र्याचे आणि अस्तित्वाचे मूल्य आहे. आजचा दिवस आपणास हा प्रश्न विचारायला भाग पाडतो की "मानव मुक्त आहे का?" जर समाजात कुणी आर्थिक गरजेमुळे स्वतःला विकत असेल, कुणी जात किंवा वर्णामुळे अपमानित होत असेल, कुणी युद्धामुळे विस्थापित होत असेल किंवा कुण्या मुलाचे बालपण चोरले जात असेल तर मानव सभ्यतेने अजूनही स्वातंत्र्याची खरी व्याख्या गाठलेली नाही. आंतरराष्ट्रीय गुलामगिरी निर्मूलन दिनाचे खरे सार असे आहे की जगात कुठेही, कोणत्याही स्वरूपात गुलामगिरी असेल तर मानवजात अद्याप परिपूर्ण झाली नाही. स्वातंत्र्य, समानता आणि मानवाचे जीवनमूल्य हे सार्वत्रिक आहेत. ते कोणत्याही राष्ट्राचे, धर्माचे, जातिचे किंवा शासनप्रणालीचे नसून संपूर्ण मानवजातीचे आहेत. सर्वांनी मिळून हे ठरवले पाहिजे की गुलामगिरीचा शेवट हा इतिहासाचा भाग नव्हे, तर वर्तमानातील ध्येय असले पाहिजे. कारण जिथे मानवाला स्वातंत्र्य नाही, तिथे प्रगती नाही; आणि जिथे समानता नाही, तिथे मानवता नाही.

**डॉ. राजेंद्र बगाटे (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

■ पान १ वरुन...

## मुंबईकरांनो सावधान! प्रदूषणाचे नियम...

**मनपाची २८ मार्गदर्शक तत्त्वे कोणती पुढीलप्रमाणे -**

• ७० मीटरपेक्षा जास्त उंचीच्या बांधकाम प्रकल्पांभोवती किमान ३५ फूट उंच पत्र्याचे आच्छादन उभारणे अनिवार्य आहे.

• एक एकरपेक्षा अधिक क्षेत्रफळ असलेल्या सर्व बांधकाम प्रकल्पांभोवती किमान ३५ फूट उंचीचे तर एका एकरपेक्षा कमी क्षेत्रफळ असलेल्या बांधकाम प्रकल्पांभोवती किमान २५ फूट उंचीचे पत्र्याचे आच्छादन लावावे.

• बांधकाम सुरु असलेल्या इमारतींना सर्व बाजूंनी हिरवे कापड / ज्यूट / ताडपत्रीने पूर्णपणे झाकून बंदिस्त करणे बंधनकारक आहे.

• कोणतेही बांधकाम पाडताना संबंधित ठिकाण हे वरपासून खालपर्यंत संपूर्णतः ताडपत्री/हिरवे कापड/ज्यूट शीटने झाकलेले असावे. प्रत्यक्ष पाडकाम करतेवेळी सातत्याने पाणी शिंपडत राहावे.

• बांधकाम प्रकल्पाच्या ठिकाणी बांधकाम साहित्य चढवताना आणि उतरवताना त्यावर पाण्याची फवारणी करत राहावे.

• बांधकामाच्या ठिकाणी धूळीचे कण निर्माण होण्यास कारणीभूत ठरणारा राडारोडा /अन्य साहित्यावर सातत्याने आणि न चुकता पाण्याची फवारणी करावी.

• बांधकाम साहित्य वाहून नेणारी सर्व वाहने पूर्णपणे सर्व बाजूंनी झाकलेली असावीत, जेणेकरून वाहतुकीदरम्यान बांधकाम साहित्य किंवा राडारोडा यांचे कण हवेत मिसळणार नाहीत. वाहनातून मर्यादेपेक्षा अधिक वजनाचे साहित्य वाहून नेऊ नये, जेणेकरुन वाहतुकीदरम्यान ते पडणार नाहीत.

• सर्व बांधकाम प्रकल्पाच्या ठिकाणी सर्व बाजूंनी सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत. याद्वारे सामानांची ने-आण करणाऱ्या वाहनांची चाके स्वच्छ केली आहेत आणि वाहनांमध्ये वजन मर्यादा पाळून साहित्य नेल्याची खातरजमा करता येईल.

• सर्व बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी संवेदक (सेन्सर) आधारित वायू प्रदूषण संनिरीक्षण प्रणाली तैनात करावी आणि मर्यादेपेक्षा जास्त प्रदूषण पातळी आढळून आल्यास त्वरित कृती करावी. ही संनिरीक्षण प्रणाली जेव्हा आणि जशी मागणी केली जाईल, त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्य अधिकाऱ्यांना पर्यवेक्षणासाठी उपलब्ध करावी.

• सर्व कामाच्या ठिकाणी ग्राइंडिंग, कटिंग, ड्रिलिंग, सॉइंग आणि ट्रिमिंगचे काम बंदिस्त भागात केले जावे आणि त्यामुळे उडणाऱ्या धूळयुक्त हवेपासून बचाव करण्यासाठी काम करताना सातत्याने पाणी फवारणी करावी.

• प्रत्येक बांधकामाच्या ठिकाणी / परिसरात निर्माण होणारा बांधकाम आणि पाडकाम राडारोडा (डेब्रीज) हा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बांधकाम व पाडकाम राडारोडा व्यवस्थापन आराखड्यानुसार, निर्देशित केलेल्या ठिकाणीच न्यावा. राडारोडा उतरवल्यानंतर, वाहन पूर्णपणे धुवावे.

• साहित्य वाहून नेणाऱ्या सर्व वाहनांकडे वैध प्रदूषण नियंत्रण (PUC) प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. सक्षम अधिकाऱ्यांनी जेव्हा आणि जसे मागितल्यास ते सादर करावे.

• सर्व बांधकाम कर्मचारी/व्यवस्थापकांनी मास्क, गॉगल, हेल्मेट इत्यादी वैयक्तिक संरक्षक उपकरणे परिधान करणे अनिवार्य असेल.

• बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सुरू असलेल्या पूल आणि उड्डाणपुलासारख्या सर्व प्रकल्पांच्या ठिकाणी २५ फूट उंचीची बॅरिकेडिंग केलेली असावी.

• मेट्रो रेल्वे प्रकल्पाची जमिनीच्या वर सुरु असलेली सर्व कामे २५ फूट उंचीच्या बॅरिकेडिंगने झाकलेली असावीत. बांधकामाची जागा ताडपत्री / हिरवे कापड / ज्यूट शीटने झाकलेली असावी. बांधकामावेळी स्मॉग गन/ वॉटर स्प्रिंकलरचा वापर करावा.

• या सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना एसआरए, म्हाडा, एमआयडीसी, एमएसआरडीसी, एमएमआरडीए, बीपीटी, भारतीय विमानतळ प्राधिकरण, रेल्वे, शासकीय किंवा निमशासकीय प्राधिकरणे तसेच खासगी बांधकाम प्रकल्पांना अनिवार्य आहेत.

• रात्री उशिरा अवैधपणे टाकला जाणारा राडारोडा रोखण्यासाठी सर्व विभागांच्या सहायक आयुक्तांनी विशेष पथके तैनात करावीत.

• सर्व विभागांचे सहायक आयुक्त आणि इमारत बांधकाम प्रस्ताव विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वायू प्रदूषण कमी करण्याच्या अंमलबजावणीचे नियमितपणे निरीक्षण करावे. वायू प्रदूषण कमी करण्याच्या अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे समावेश असलेले पथक तैनात करावे.

• दोन (वॉर्ड) अभियंता, एक पोलिस, एक मार्शल, वाहन.

• प्रत्येक पथकाचे नेतृत्व हे विभाग कार्यालयातील एक वरिष्ठ अधिकारी करतील. विभाग स्तरावर ही पथके गठित करून तातडीने त्यांची नेमणूक करण्यात यावी. विभागनिहाय पथकांची संख्या पुढीलप्रमाणे असावी –

- लहान विभाग- प्रत्येक विभागासाठी दोन पथके
- मध्यम विभाग- प्रत्येक विभागासाठी चार पथके
- मोठे विभाग- प्रत्येक विभागासाठी सहा पथके

• अंमलबजावणी पथकांनी संबंधित परिसराला भेट देऊन कामाच्या ठिकाणाची व्हिडिओग्राफी करावी. कामाच्या ठिकाणी विहित सर्व तरतुदींचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आल्यास, काम थांबवण्याची नोटीस जारी करणे आणि/किंवा कामाचे ठिकाण सील करणे, यासारखी कठोर कारवाई तत्काळ करावी.

• स्प्रिंकलर्स आणि स्मॉग गन इत्यादी व्यवस्था उभारण्याची कार्यवाही सर्व प्रकल्प प्रस्तावक / कंत्राटदारांनी काटेकोरपणे आणि न चुकता करावी.

• बांधकाम साहित्य किंवा बांधकाम आणि पाडकाम साहित्य वाहून नेणारी वाहने, विहित तरतुदींचे पालन करत नसल्याचे आढळून आल्यास त्यांच्यावर जप्तीची कारवाई करावी.

• वजनमर्यादेपेक्षा अधिक वजन वाहून नेणारी वाहने, न झाकलेली वाहने, रस्त्यांवर बांधकाम साहित्य पडेल अशा रितीने धावणारी वाहने यांच्यावर परिवहन आयुक्त कारवाई करतील. आठ वर्षांहून अधिक जुन्या अवजड डिझेल वाहनांना मुंबई कार्यक्षेत्रात वाहतूक करण्यास सक्त मनाई असेल.

• महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दररोज बीपीसीएल, एचपीसीएल, आरसीएफ, टाटा पॉवर तसेच जवळपासच्या औद्योगिक वसाहत क्षेत्रातील उद्योग इत्यादी ठिकाणांहून उत्सर्जित होणाऱ्या वायू प्रदूषणाचे दैनंदिन स्वरूपात निरीक्षण करुन योग्य ती कारवाई करावी. या कारवाईचा दैनंदिन अहवाल अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) आणि अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) यांना सादर करावा.

• ज्यांच्यामध्ये ट्रैकिंग सिस्टम बसवलेली आहे, अशाच वाहनांचा कामांसाठी सर्व बांधकाम व्यावसायिक /विकासकांनी वापर करावा.

• खुली/सुटी माती, वाळू, बांधकाम साहित्य आणि कोणत्याही प्रकारचा व कुठल्याही प्रमाणातील राडारोडा सीमांकित/समर्पित क्षेत्रामध्ये योग्यरित्या बॅरिकेड केलेल्या, पूर्णपणे झाकलेल्या / बंद केलेल्या ठिकाणी ताडपत्रीच्या आच्छादनाखाली ठेवावा, सार्वजनिक रस्ते, पदपथ, पदमार्गिका आणि मोकळया जागेवर बांधकाम साहित्य आणि राडारोडा टाकला जाणार नाही, याची खात्री करावी.

• प्रत्येक बांधकाम प्रकल्पास्थळी बाहेर पडण्याच्या ठिकाणी वाहनांची चाके धुण्याची सुविधा असावी. प्रमुख रस्त्यांवरील धूळ रोज व्हॅक्यूम स्वीपिंग किंवा पाण्याची फवारणी करून, घासून, झाडू मारून स्वच्छ करावी.

• बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील भौगोलिक क्षेत्रामध्ये विशेषतः क्षेपणभूमी (डम्पिंग ग्राऊंड) आणि कचरा जाळण्याच्या संभाव्य ठिकाणी कुठेही उघड्यावर कचरा जाळण्यावर पूर्णपणे बंदी असेल.

• बांधकामाच्या ठिकाणी वास्तव्यास असलेल्या कामगारांसाठी जेवण तयार करण्यासाठी लाकूड व तत्सम इंधन म्हणून मोठ्या प्रमाणावर वापरात येत असल्याचे महानगरपालिका प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. अशा इंधनांमुळे मोठ्या प्रमाणात धूर पसरतो तसेच प्रसंगी सुरक्षेचा प्रश्न देखील निर्माण होऊ शकतो. हे लक्षात घेता संबंधित विकासकांनी अशा ठिकाणी कामगारांच्या भोजनाची व्यवस्था करावी. जेणेकरुन त्यांना जेवण बनवण्यासाठी इंधन म्हणून लाकडे व तत्सम बाबी जाळाव्या लागणार नाहीत आणि पर्यायाने धूरही होणार नाही. तसेच, संबंधित बांधकामाची ठिकाणे अधिक सुरक्षित राहतील.

## मुंबईत आता ४०x४० फुटांपेक्षा मोठ्या...

या भीषण दुर्घटनेत १७ लोकांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता, तर ७० लोक जखमी झाले होते. या दुर्घटनेच्या सखोल चौकशीनंतर आणि भविष्यात असे अपघात टाळण्यासाठी मुंबई महानगरपालिकेला नवीन जाहिरात धोरण तयार करण्याचे निर्देश देण्यात आले होते.मुंबई शहरात आता ४०x४० फुटांपेक्षा मोठ्या आकाराच्या जाहिरात फलकांना परवानगी नसेल. फुटपाथवर तसेच इमारतींच्या छतांवर जाहिराती प्रदर्शित करण्यास परवानगी नाही. डिजिटल जाहिरात फलकांची (Digital Hoardings) चमक (Luminance Ratio) ३:१ च्या प्रमाणापेक्षा अधिक ठेवता येणार नाही. झिलमिलणाऱ्या (Flickering) जाहिराती प्रदर्शित करण्यास परवानगी नसेल.

## प्रिस्क्रिप्शनशिवाय कफ सिरप विक्रीला...

या हानिकारक रसायनामुळे गांबिया, उझबेकिस्तान आणि कॅमेरूनमध्ये अनेक मुलांचा मृत्यू झाला. अलिकडेच मध्य प्रदेशातही काही मुलांचा मृत्यू झाल्याचे समोर आले. खोकला आणि सर्दीसारख्या सामान्य आजारांवरही सरकार लोकांना स्वतःहून औषधोपचार करण्याऐवजी डॉक्टरांचा सल्ला घेण्यास प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न करत आहे. त्यादृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल असल्याचे म्हटले जात आहे.

## यापुढे आधार कार्ड हा जन्मतारखेचा...

महसूल विभागाने जारी केलेल्या १६-कलमी मार्गदर्शक तत्त्वांनुसार, ११ ऑगस्ट २०२३ रोजी जन्म आणि मृत्यू नोंदणी कायदा, १९६९ मध्ये केलेल्या सुधारणेनंतर उप-तहसीलदारांनी जारी केलेले आदेश मागे घेतले जातील. हे आदेश सक्षम अधिकारी किंवा जिल्हाधिकाऱ्यांच्या स्तरावर तपासले जातील. सार्वजनिक आरोग्य विभागाने जारी केलेल्या नियमांनुसार कारवाई केली जाईल.

## पोलीस दलात प्रथमच! नवी मुंबईतील...

पोर्ट विभागात उरण, न्हावाशेवा, मोरा सागरी आणि उलवे पोलीस ठाण्यांना हे मानांकन देण्यात आले. त्याचबरोबर गुन्हे शाखा (मुख्यालय), विशेष शाखा, प्रशासन, डीसीपी ट्रॅफिक, सायबर सेल, पोलिस मुख्यालय, मोटार ट्रान्सपोर्ट विभाग आणि पुरावा व्यवस्थापन केंद्र (ईएमसी) यांनाही आयएसओ प्रमाणपत्र मिळाले. समारंभात आयुक्त भारंबे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांचे कौतुक करताना, "नागरिक-केंद्रित policing आणि सेवा गुणवत्तेची शाश्वत उंची गाठण्याच्या प्रवासातील हा महत्त्वाचा टप्पा आहे," असे सांगितले.

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4, Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate, Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com, Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# राजेश अग्रवाल यांनी मुख्य सचिव पदाचा पदभार स्वीकारला



**मुंबई (राकेश गायकवाड) :** मावळते मुख्य सचिव राजेशकुमार यांच्याकडून नवनियुक्त मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी आज पदभार स्वीकारला. शासनाने राज्याच्या मुख्य सचिव पदावर श्री. अग्रवाल यांच्या नियुक्तीचे आदेश निर्गमित केले होते. मंत्रालयातील मुख्य सचिवांच्या दालनात झालेल्या या कार्यक्रमाप्रसंगी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी.गुप्ता, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनिषा वर्मा, सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा, कृषी विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव (अ.व.सु) राधिका रस्तोगी, मदत पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वैद-सिंगल, ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, मुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव श्रीकर परदेशी, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव पंकज कुमार, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, पशुसंवर्धन, दुग्ध विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव रामास्वामी एन, दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंडे, माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अमित सैनी यांच्यासह मुख्य सचिव कार्यालय व अन्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. महाराष्ट्राचा विकास आणि गौरव वाढविण्यासाठी प्रभावीपणे कार्यरत राहीन असे मुख्य सचिव पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर श्री. अग्रवाल म्हणाले.

### राजेश अग्रवाल यांचा अल्प परिचय

■ राजेश अग्रवाल हे भारतीय प्रशासकीय सेवेतील महाराष्ट्र कॅडरचे १९८९ चे अधिकारी असून त्यांचे मूळ गाव पंजाबमधील जालंधर हे आहे. त्यांनी कॉम्प्युटर सिस्टिम विषयामध्ये बी.टेक केले आहे. आपल्या सेवाकाळात त्यांनी सहायक जिल्हाधिकारी रत्नागिरी, जिल्हा परिषद जळगाव येथे मुख्य कार्यकारी अधिकारी, अकोला येथे जिल्हाधिकारी, महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथे उप विशेष आयुक्त, केंद्रीय ग्रामविकास राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, भारत निवडणूक आयुक्त कार्यालयात संचालक, मंत्रालय मुंबई येथे सामान्य प्रशासन विभागाचे सचिव, इंटर्नल एक्स्चेंज ऑफ इंडिया नवी दिल्ली येथे राष्ट्रीय अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, मंत्रालय मुंबई येथे कृषी, मत्स्यव्यवसाय विभागात सचिव, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागात सचिव (अतिरिक्त कार्यभार), वित्त विभागात सचिव, सामान्य प्रशासन विभागात प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान), वित्त विभागात लेखा व कोषागारे विभागात सचिव पदाचा अतिरिक्त कार्यभार, वित्त विभागात सचिव (लेखा व कोषागारे)(व्यय – अतिरिक्त कार्यभार), केंद्र सरकारच्या वित्त सेवा विभागात सह सचिव, केंद्र सरकारच्या आदिवासी विकास विभागात सह सचिव, केंद्र सरकारच्या कौशल्य विकास विभागाचे महासंचालक (प्रशिक्षण), पेट्रोलियम आणि नॅचरल गॅस विभागात अतिरिक्त सचिव आणि वित्त सल्लागार, केंद्र सरकारच्या कौशल्य विकास विभागात सचिव, केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय विभागात सचिव, मंत्रालय मुंबई येथे सामान्य प्रशासन विभागात अतिरिक्त मुख्य सचिव अशा विविध पदांवर काम केले आहे.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन

# अभ्यागतांसाठी सूचना व भित्तिपत्रकाचे राज्यपालांच्या हस्ते प्रकाशन

**मुंबई (प्रथमेश चव्हाण) :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी मुंबई येथे अभिवादनासाठी येणाऱ्या अभ्यागतांसाठी तयार करण्यात आलेल्या सुचना पुस्तिकेचे व भित्तीपत्रकाचे प्रकाशन राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते रविवारी (दि. ३०) राजभवन, मुंबई येथे करण्यात आले. यावेळी बोलताना राज्यपालांनी डॉ आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा गौरव केला. ज्येष्ठ आर्य समाजी नेते आत्माराम अमृतसरी यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला पाठविण्यास मदत व शिफारस केली असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत समरसता व बंधुभाव या मूल्यांच्या प्रचार प्रसारासाठी आपण विविध तालुक्यांना भेट देण्याचा उपक्रम हाती घेतला असल्याचे राज्यपालांनी यावेळी सांगितले. आजपर्यंत आपण गुजरात येथील ११ गावांना भेट दिली असून त्याठिकाणी ग्राम स्वच्छता, वृक्षारोपण,



ग्रामसभा, दलित - आदिवासी कुटुंबाच्या घरी भोजन, शाळेत मुक्काम व दुसऱ्या दिवशी शिवारावर जाऊन लोकांना नैसर्गिक शेतीचे महत्व पटवणे हा उपक्रम सुरु केला असल्याचे राज्यपालांनी सांगितले. महाराष्ट्रात देखील हा उपक्रम सुरु करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी महाराष्ट्र राज्य त्रिभाषा धोरण समितीचे अध्यक्ष डॉ नरेंद्र जाधव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे तसेच समितीचे इतर सदस्य यावेळी उपस्थित होते.

# शिक्षकांना मिळणार 'सकारात्मक शिस्ती' चे धडे



**मुंबई (नितीन देवळेकर) :** मुंबई : विद्यार्थ्यांवरील शारीरिक शिक्षेच्या वाढत्या घटनांमुळे निर्माण झालेल्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण विभागाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात राज्यभर आयोजित होणाऱ्या शिक्षण परिषदांमध्ये 'सकारात्मक शिस्त' या विषयावर किमान ४५ मिनिटांचे विशेष मार्गदर्शन सत्र घेण्याचे निर्देश शालेय शिक्षण विभागाकडून देण्यात आले आहेत. राज्यातील सर्व जिल्हा, तालुका आणि केंद्रस्तरीय परिषदांमध्ये हे सत्र अनिवार्यपणे घेण्यात येणार असून, शिक्षकविद्यार्थी नातेसंबंध अधिक संवेदनशील आणि सकारात्मक करण्याच्या दिशेने हा उपक्रम घेतला जाणार आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेची 'मुख्याध्यापक मार्गदर्शिका भाग २' मधील 'सकारात्मक शिस्त एक आव्हान' हा लेख मार्गदर्शनासाठी उपयोगी ठरेल, असे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. विविध परिषदेच्या सत्रात शारीरिक शिक्षकांना शिक्षेबाबत शिक्षण अधिकार अधिनियमातील तरतुदी, शिक्षकांची जबाबदारी, शिक्षेचे प्रकार व त्यांचे मानसिक-शारीरिक परिणाम, मेंदूवर होणारे दुष्परिणाम, तसेच विविध शैक्षणिक विचारवंतांचे सकारात्मक शिस्तीवरील विचार यांचा परिचय करून दिला जाणार आहे. वर्गातील संवाद, सहकार्य, समुपदेशन, योग्य शिस्तीचे मार्ग, सकारात्मक तंत्रे आणि प्रत्यक्ष उपक्रम यांसारखे मुद्देही सत्राचा भागाचा समावेश करावा, असेही म्हटले आहे. शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी या उपक्रमाला प्रेरणा दिली आहे. "शिस्त ही भीतीतून नव्हे, तर विश्वासातून निर्माण झाली पाहिजे. सकारात्मक शिस्त हीच मुलांच्या उज्ज्वल भविष्याची खरी पायाभरणी असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

# मुंबई शहरातील कचरावहन क्षमता होणार दुप्पट

**मुंबई (विशाल कारंडे) :** मुंबईचा कचरा दररोज वाहून नेणाऱ्या वाहनांच्या ताफ्यात आता तीस नवीन मिनी कॉम्पॅक्टर वाहने दाखल झाली आहेत. त्यामुळे वाहनांअभावी पडून राहिलेला कचऱ्याची समस्या आता दूर होणार आहे. ही वाहने एका सत्रात दोन फेऱ्या करणार आहेत. मुंबईत कचऱ्याचे वहन करणारे कॉम्पॅक्टर वाहने जुनी असून ती नादुरूस्त आहेत. यामुळे काही वेळा रस्त्यावर कचरा पडत आहे. जुन्या मिनी कॉम्पॅक्टरच्या तुलनेत नवीन वाहनांना एका फेरीत दुप्पट कचरा वाहून नेण्याची क्षमता आहे. याआधीच्या वाहनांमध्ये भेडसावणाऱ्या अडचणींचा



अभ्यास करून परिवहन अभियांत्रिकी विभागाने यात सुधारणा केल्या आहेत. यात स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी योग्य आसनव्यवस्था, ओला व सुका कचरा यांसाठी स्वतंत्र कप्पे, तसेच दीर्घकाळ टिकणाऱ्या साधनसामुग्रीचा वापर यांमुळे मिनी कॉम्पॅक्टरचे आयुष्यमान वाढण्यास मदत होणार आहे. कचरा वाहतूक करणाऱ्या वाहनांमध्ये, कचऱ्यातून निघणाऱ्या द्रव्यामुळे (लिचेट) धातुपत्रा सतत खराब होत असल्याचे आढळून येत होते. नव्या वाहनांमध्ये ५ मिमी जाडीच्या 'हार्डोक्स' स्टील मटेरियलचे फ्लोरिंग वापरले आहे. परिणामी वाहनाचे आयुष्यमान चांगले राहणार आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या ताफ्यातील सर्व वाहनांचे रंग येत्या काळात पांढरा आणि निळा अशा रंगसंगतीत बदलण्याचा प्रशासनाचा मानस आहे. ही प्रक्रिया टप्पेनिहाय पद्धतीने पार पाडण्यात येणार आहे. आगामी कालावधीत घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या ताफ्यातील सर्व वाहने ही नव्या रंगसंगतीनुसार रंगवण्यात येणार असल्याची माहिती उपायुक्त किरण दिघावकर यांनी दिली.

### मिनी कॉम्पॅक्टरची वैशिष्ट्ये

- इंजिन क्षमता : ११५ अश्वशक्ती
- एकाच फेरीत ५ टन कचरा वाहून नेण्याची क्षमता
- ९ घनमीटर - कचरा सामावण्याची अधिक क्षमता
- कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र ४ आसनी व्यवस्था

# मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग दहा पदरी करण्यासाठी १६ हजार कोटींचा प्रस्ताव



**मुंबई (सम्यक कासारे) :** मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाचे लवकरच दहा पदरीकरण करण्यात येणार आहे. यासाठी १६ हजार कोटी रुपये खर्च येणार आहे. यासंबंधीचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने प्रशासकीय मंजुरीसाठी राज्य शासनाकडे पाठवला आहे. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग ९४.५ किमीचा असून तो २००२ साली सुरू झाला. या महामार्गावरून मुंबई ते पुणे प्रवास अडीच तासांत करता येतो. या रस्त्यावरून दररोज ६५ हजारांहून अधिक वाहने धावतात. येथे दिवसेंदिवस वाढणारी वाहतूक कोंडी आणि अपघात पाहता सुरक्षित आणि जलद प्रवासासाठी महामार्गाचे आठ पदरीकरण करण्याचा प्रस्ताव एमएसआरडीसीने राज्य शासनाकडे पाठवला होता. तो रद्द करून आता या महामार्गाचे दहा पदरीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महामुंबईचा ग्रोथ हब म्हणून विकास करण्यात येत आहे. तसेच डिसेंबरपासून नवी मुंबई विमानतळावरील वाहतूक सुरू होत आहे. यामुळे भविष्यात वाढणाऱ्या वाहनसंख्येचा विचार करून दहा पदरीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी १६ हजार कोटींचा प्रस्ताव राज्य शासनाला पाठवण्यात आला आहे. यापैकी २०० कोटी रुपये भूसंपादनासाठी आवश्यक आहेत. दहा पदरीकरणाच्या कामात सहा बोगदे बांधण्यात येणार आहेत. यासाठी ८५ हेक्टर जागा संपादित करावी लागणार आहे. प्रस्तावास मंजुरी मिळाल्यानंतर रस्ता रुंदीकरणाच्या प्रत्यक्ष कार्यवाहीला सुरुवात केली जाईल. महामार्गाचे रुंदीकरण झाल्याने वाहतूक कोंडी कमी होईल व प्रवासाचा वेग वाढेल.

# काळाचौकीतील महापालिका शाळेच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष!

**मुंबई (गणेश बागडे) :** मुंबई महानगरपालिका शाळांच्या दुरुस्तीवर करोडो रुपयांचा खर्च करत असताना काळाचौकी येथील महापालिका शाळेच्या दुरवस्थेकडे मात्र दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे दोन दिवसांपूर्वी शाळेची एक ग्रिल कोसळून दुर्घटना घडली. यात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी मुंबई महापालिका प्रशासनाची अब्रु मात्र चव्हाट्यावर आली. काळाचौकी प्राथमिक शाळेत दुर्घटना घडली तेव्हा घटनास्थळी विद्यार्थी व कर्मचारीही उपस्थित नव्हते. त्यामुळे जीवितहानी टळली असली तरी महापालिका



प्रशासन मात्र याबाबत बेफिकीर असल्याचे दिसून आले आहे. या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या दुर्घटनेची माहिती स्थानिक राजकीय पक्षांच्या नेत्यांसह नागरिकांनी दिल्यानंतर शिक्षण विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. झालेल्या दुर्घटनेसह शाळा इमारतीची पाहणी करून, त्याचा अहवाल शिक्षण विभागाला सादर केला. त्यामुळे आता तरी या शाळेची दुरुस्ती होईल, अशी अपेक्षा स्थानिक नागरिकांची आहे. जुन्या शाळेमध्ये होणाऱ्या पडझडीची जबाबदारी शिक्षण विभागाच्या एखाद्या अधिकाऱ्यावर निश्चित करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,**
**प्रशासकीय इमारत, १ ला मजला,**
**भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.**
**Email-northmumbai.ee.@mahapwd.com**
**दुरध्वनी क्रमांक .०२२-२६२३१९६४ फॅक्स - २६२०५७८८**

## ई - निविदा सुचना क्र. ४४ सन २०२५-२०२६

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक- २६२३१९६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत मुंबई उपनगर जिल्हा (पश्चिम उपनगरे) मजूर सहकारी संस्था मार्यादित, मुंबई, यांच्या कडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https//mahatenders.gov.in येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. अर्जदार मजूर संस्था ज्या उपनगरातील संबंधीत असेल त्याच उपनगरातील कामासाठी अर्ज करु शकतात.

| अ. क्र | कामाचे नांव | रक्कम |
|---|---|---|
| १ | कांदिवली (प) मुंबई येथील एटीएस कार्यालयाच्या तिसऱ्या व चौथ्या मजल्याची दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | रु.४९९४१५६/- |
| २ | शासकिय तंत्रनिकेतन मुंबई येथील तिसऱ्या मजल्यावरील संगणक प्रयोगशाळेचे बळकटीकरण व नुतनीकरणचे कामे करणे. | रु.४४८६९२५/- |
| ३ | अन्न व औषध प्रशासन इमारतीमधील औषध अधिकारी यांच्या दलानाचे बळकटीकरण व नुतनीकरण कामे करणे. | रु.४६६४२२७/- |
| ४ | न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संस्थेच्या आवारातील मुख्य इमारतीमधील बाह्य भागाचे मजबुतीकरण व नुतनीकरण करणे. | रु.४९८९४५२/- |
| ५ | मुळगौण कामाअंतर्गत पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१२, मुंबई या कार्यालयातील सेल ऑफिस रुम न. १,२ व रिडर रुम नं. ५ व ६ ची दुरुस्ती करणे. | रु.१७४६८०९/- |
| ६ | मुळगौण कामाअंतर्गत पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१२, मुंबई या कार्यालयातील विश्रांती कक्षाची दुरुस्ती करणे. | रु.१३५३६५०/- |
| ७ | जिल्हा सैनिकी कल्याण कार्यालयाच्या इमारतीमधील सैनिकी अधिकारी कक्षाचे मजबुतीकरण व नुतनीकरण करणे. | रु.३१२३५२७/- |
| ८ | अन्न व औषध प्रशासन इमारतीमधील परिषद कक्ष व संगणक कक्षाचे बळकटीकरण व नुतनीकरण कामे करणे. | रु.४३१०४९१/- |
| ९ | अन्न व औषध प्रशासन इमारतीमधील दक्षता अधिकारी यांच्या दालानाचे बळकटीकरण व नुतनीकरण कामे करणे. | रु.४१९८९७०/- |
| १० | मुळगौण कामाअंतर्गत एम.एच.बी. कॉलनी पोलीस स्टेशन बोरीवली (पश्चिम), मुंबई या इमारतीच्या दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावरील प्रसाधनगृहाची दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | रु.११७१५९६/- |
| ११ | न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संस्थेतील स्ट्रॉम वाहिनीचे नुतनीकरण करणे. | रु.४४२६६५५/- |
| १२ | विशेष दुरुस्ती अंतर्गत ९८ शासकीय कर्मचारी निवासस्थाने इमारत क्र. ५५-अे, बी आणि ५६-सी, योगीनगर बोरीवली (प), मुंबई येथील सदनिकांचे गिलावा रंगकाम तसेच इतर स्थापत्य विषयक कामे करणे. | रु.२४८३५००/- |
| १३ | मुळगीण कामाअंतर्गत बोरीवली पोलीस स्टेशन बोरीवली (पश्चिम), मुंबई येथील बोरीवली पोलीस स्टेशन या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरीन प्रसाधनगृहाची दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | रु.१३१४९२०/- |
| १४ | अन्न व औषध प्रशासन इमारतीमधील वरांड्याचे बळकटीकरण व नुतनीकरण तसेच छतावर पत्रे बसविणे इत्यादी कामे करणे | रु.४७५९८६१/- |
| १५ | मुळगौण कामाअंतर्गत पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१२, मुंबई या कार्यालयातील शस्त्रागार रुम नं. १,२,३ व ४ची दुरुस्ती करणे. | रु.१५२७३४३/- |
| १६ | मुळगौण कामाअंतर्गत पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१२, मुंबई या कार्यालयातील रुम नं. ३,७ तसेच सेल ऑफिसच्या प्रसाधनगृहाची दुरुस्ती करणे. | रु.१६९०५९२/- |
| १७ | न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संस्थेच्या आवारातील मुख्य इमारतीमधील तळमजल्यावरील प्रयोगशाळेतील भागाचे मजबुतीकरण व नुतनीकरण करणे. | रु.४९९७१६५/- |
| १८ | मुळगौण कामाअंतर्गत बोरीवली पोलीस स्टेशन बोरीवली (पश्चिम), मुंबई येथील बोरीवली पोलीस स्टेशन या इमारतीच्या पहिल्या मजल्यावरीन प्रसाधनगृहाची दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | रु.१२५२८०३/- |
| १९ | शासकिय तंत्रनिकेतन मुंबई येथील रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र प्रयोगशाळेचे बळकटीकरण व नुतनीकरण कामे करणे. | रु. ४५६४१५१/- |
| २० | अन्न व औषध प्रशासन इमारतीमधील स्टोर खोलीचे बळकटीकरण व नुतनीकरण कामे करणे. | रु.१३४००६१/- |
| २१ | मुळगौण कामाअंतर्गत दहिसर पोलीस स्टेशन येथील क्राईम ब्रॅन्च कार्यालयाच्या इमारतीच्या छतावर जी. आय. शीट बसविणे. | रु.२०५६३८२/-. |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई(सा.बां) विभाग, अंधेरी (प.) मुंबई ५८. यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. २६/११/२०२५ ते दि. ०४/१२/२०२५ पर्यंत वेळ : १५:००**
**ई-निविदा उघडणे- दि. ०५/१२/२०२५ वेळ : १५:००**

जा.क्रा.काअ/उमुंवि/निविदा/ ७६९३
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई ( सा.बां) विभाग, प्रशासकीय इमारत,
१ ला मजला, भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.
दिनांक :- २० नोव्हेंबर २०२५

सही/-
कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई (सा.बा.) विभाग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.

**आरओसी - 2025-26/क्र- 5/C४२३३**

# कोकण विभागीय आयुक्तांकडून पालघर जिल्ह्यातील आरोग्य, शिक्षण व आदिवासी विकास कामांची व्यापक पाहणी



**नवी मुंबई (भावना जैन) :** कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांनी पालघर जिल्ह्यातील जव्हार आणि मोखाडा तालुक्यांमध्ये आरोग्य, शिक्षण, ग्रामीण विकास आणि आदिवासी कल्याण या विविध क्षेत्रांमध्ये राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची शुक्रवारी प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांच्या या दौऱ्यात विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जिल्हा परिषदेकडून प्रसिद्ध झालेल्या निवेदनात या पाहणी दौऱ्याची माहिती देण्यात आली. या दौऱ्यात जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड, मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे, प्रकल्प अधिकारी अपूर्वा बासुर, उपायुक्त घोरपडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालिका डॉ. रूपाली सातपुते, उपजिल्हाधिकारी भाऊसाहेब पटांगडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मनरेगा) अतुल पारसकर, तसेच जिल्हा कृषी विकास अधिकारी सोमनाथ पिंजारी हे अधिकारी उपस्थित होते. दौऱ्यादरम्यान आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी एका प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देत उपलब्ध वैद्यकीय सुविधा, रुग्णसेवा, औषधसाठा, कर्मचाऱ्यांची उपस्थिती आणि सेवा प्रदानाची स्थिती तपासली. काही सेवांमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास येताच त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने उपाययोजना करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. यापुढे आयुक्तांनी जव्हार आणि मोखाडा तालुक्यांमधील कातकरी वस्तीला भेट दिली. तेथे उपलब्ध मूलभूत सुविधा, पिण्याचे पाणी, वीज, रस्ते, घरकुल, शौचालये आणि सुरू असलेली इतर विविध विकासकामांची माहिती त्यांनी प्रत्यक्ष पाहणीद्वारे घेतली. आदिवासी समाजाच्या जीवनमान उन्नतीसाठी सरकारी योजना किती प्रभावीपणे पोहोचत आहेत, याचाही त्यांनी सविस्तर आढावा घेतला. कातकरी वस्तीतील महिलांच्या स्वयं-सहायता गटांनी स्थापन केलेल्या विटभट्टी उपक्रमाचे डॉ. सुर्यवंशी यांनी विशेष कौतुक केले. महिलांनी एकत्र येऊन सुरू केलेला हा उद्योग स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देत असून ग्रामीण उद्योजकतेसाठी प्रेरणादायी ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. महिला बचतगटांशी संवाद साधताना आयुक्तांनी 'लखपती दीदी योजना', मोगरा शेतीचा विस्तार, उत्पादनांच्या बाजारपेठेचा विकास, कौशल्यविकास प्रशिक्षण आणि ग्रामीण उद्योगांच्या संधी यावर चर्चा केली. महिलांनी आत्मनिर्भरतेकडे घेतलेली पावले आणि गावांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी केलेला प्रयत्न प्रशंसनीय असल्याचे त्यांनी सांगितले. या पाहणी दौऱ्यात आरोग्य सुविधा सुधारणा, शिक्षणाच्या गुणवत्तेत वाढ, आदिवासी भागातील पायाभूत सुविधांची उभारणी आणि ग्रामीण महिलांना उद्योगक्षम बनविण्यावर अधिक भर देण्याची गरज असल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदविले.

चालू वर्षाच्या मागणीसह थकीत पाणी बिल भरणा करणाऱ्या नागरिकांना

# प्रशासकीय आकारामध्ये १०० टक्के सूट : आयुक्त सौरभ राव

**ठाणे (तृप्ती गोरे) :** महापालिका कार्यक्षेत्रातील घरगुती वापरासाठी असलेल्या नळसंयोजनाचे थकीत देयक चालू वर्षाच्या मागणीसह एक रकमी भरणा केल्यास प्रशासकीय आकारामध्ये (दंड / व्याज) १०० टक्के सूट लागू करण्यात आली असल्याची माहिती महापालिका आयुक्त तथा प्रशासक सौरभ राव यांनी आज दिली. थकीत पाणीपट्टी बिलावर १०० टक्के इतकी भरीव सवलत जाहिर करण्यात आल्याने नागरिकांना आर्थिक दिलासा मिळणार असून या योजनेचा लाभ नागरिकांनी घ्यावा असे आवाहन आयुक्तांनी केले आहे. ठाणे महापालिकेने पाणीपट्टी वसुलीची मोहिम हाती घेतली असून जे नागरिक पाणापट्टी भरणार नाही अशा थकीत बिलधारकांचे नळसंयोजन खंडित करण्याची कारवाई करण्यात येणार आहे, तरी नागरिकांनी पाणीपट्टी भरुन महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त सोरभ राव यांनी केले आहे. सदर योजना दि. १ डिसेंबर २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत लागू राहील. वरील योजनेचा लाभ घेऊन थकीत व चालू पाणी देयकाची रक्कम पूर्णपणे भरुन त्यावरील प्रशासकीय आकारामध्ये (दंड / व्याज) १०० टक्के सूट / सवलत योजनेचा लाभ नागरिक घेवू शकतील. या धोरणात्मक निर्णयापूर्वी ज्या घरगुती पाणी बील धारकांनी पाणी पुरवठा देयके जमा केली असतील अशांना सदरची सवलत योजना लागू असणार नाही. तसेच ही योजना व्यवसायिक संयोजन धारकांना लागू असणार नाही. जे नागरिक दि. ३१/०३/२०२६ आपली थकबाकीची रक्कम प्रलंबित ठेवतील अशा खातेदारांवर जप्ती कारवाई तात्काळ प्रस्तावित करुन नळ संयोजन खंडीत करणे, मिटर रुम सिल करणे व पंप जप्ती अशी कारवाई होईल असे आयुक्त यांनी यावेळी नमूद केले. या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावधी होणेसाठी प्रभाग समिती स्तरावर माहिती फलक लावण्यात यावेत व सदर योजना प्रभावीपणे राबवावी अशी सूचना आयुक्तांनी केली आहे. या योजनेचा लाभ जास्तीत नागरिकांनी घ्यावा असे आवाहन महापालिका आयुक्त तथा प्रशासक सौरभ राव यांनी केले आहे.

# मिरा-भाईंदरमध्ये श्री विठूरायाची ५१ फुटी भव्य मूर्ती साकारणार



**भाईंदर (सचिन कदम) :** अवघ्या महाराष्ट्रातील प्रामुख्याने वारकरी संप्रदायाचे आराध्य दैवत असलेल्या श्री विठूरायाची ५१ फुटी भव्य मूर्ती मिरा-भाईंदरमध्ये साकारण्यात येत आहे. या मूर्तीचे अनावरण रविवारी, ३० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे. श्री विठूरायाची भव्य मूर्ती ठाण्याप्रमाणेच मिरा-भाईंदरमध्ये सुद्धा साकारण्यात यावी, अशी संकल्पना सरनाईक यांनी मांडली होती आणि हि संकल्पना येत्या ३० नोव्हेंबरला पूर्णत्वास जाणार आहे. मूर्तीच्या अनावरण पूर्वी भाईंदर पूर्वेकडील गोडदेव गाव परिसरात असलेले विठ्ठल मंदिर ते नवघर तलाव दरम्यान भव्य पालखी सोहळ्याचे आयोजन सायंकाळी ६ वाजता करण्यात आले आहे. पालखी सोहळ्यानंतर श्री विठूरायाच्या ५१ फुटी भव्य मूर्तीचे सायंकाळी ७ वाजता भाईंदर पूर्वेच्या नवघर नाका येथील; शंकर नारायण महाविद्यालयासमोरील स्व. शामराव पाटील उद्यानात अनावरण करण्यात येणार आहे. त्याची जय्यत तयारी सध्या सुरु असून हा सोहळा याची देही याची डोळा पाहण्यासाठी प्रत्येक विठ्ठल भक्तांनी उपस्थित रहावे, असे आवाहन सरनाईक यांनी केले आहे.

# मिरा-भाईंदर महानगरपालिकेत विशेष मतदार सहाय्यता केंद्र (HELP DESK ) सुरु

## महापालिकेकडून मतदारांची नावे तपासण्यासाठी सुविधा



**मिरा भाईंदर (सुचिता देशमुख) :** मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार महानगरपालिका मुख्य कार्यालय तसेच सर्व प्रभाग कार्यालयांमध्ये विशेष "मतदार सहाय्यता केंद्र सुरू करण्यात आली आहेत. मतदार सहाय्यता केंद्रामार्फत मतदारांना आपले नाव कोणत्या वॉर्ड मध्ये समाविष्ट करण्यात आले आहे, हे तपासण्यासाठी नागरिकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदारांना मतदार यादीत आपले नाव शोधणे आता अधिक सोपे आणि सुलभ झाले आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या mahasecvoter-list.in या संकेतस्थळावर भेट देऊन नागरिकांना Name Wise किंवा EPIC Number Wise आपली माहिती अत्यंत सोप्या पद्धतीने तपासता येणार आहे. याचीच थेट लिंक महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर mbmc.gov.in उपलब्ध करून देण्यात आली आहे. मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी जाहीर केलेल्या निवडणूक प्रक्रियेतील महत्त्वाच्या तारखांनुसार प्रारूप मतदार यादीवरील हरकती व सूचना दाखल करण्याची अंतिम तारीख ०३ डिसेंबर २०२५ निश्चित करण्यात आली आहे. नागरिकांनी आपले नावे चुकीच्या वॉर्ड मध्ये समाविष्ट झाले असल्यास, मुदतीत हरकती व सूचना दाखल कराव्यात. हरकती व सूचना मिरा-भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, कर विभाग, पहिला मजला येथे प्रत्यक्ष स्विकारल्या जाणार आहेत. नागरिकांनी या मतदार सहायता केंद्राला भेट देऊन मतदार यादीतील आपले नाव व वॉर्ड क्रमांक तपासून घ्यावे , असे आवाहन मिरा-भाईंदर महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

# ठाण्यात भटक्या श्वानांना पकडून त्यांच्या अवयवांचे बेकायदेशीर प्रत्यारोपण



**ठाणे (विशाल कारंडे) :** ठाण्यातील भटके श्वान पकडून या श्वानांचे बेकायदेशीरपणे प्रत्यारोपण करणारी टोळी सक्रिय असल्याची गंभीर बाब खासदार नरेश म्हस्के यांनी ठाणे महापालिका प्रशासनाच्या निदर्शनास आणली आहे. या कामासाठी उत्तर प्रदेश किंवा बिहारच्या काही मुलींची टोळी सक्रिय असून यामध्ये स्थानिक पेट सेंटर आणि डॉक्टरांचा देखील सहभाग असल्याचा संशय म्हस्के यांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणाचा तत्काळ तपास करण्याचे आदेशही त्यांनी पालिका प्रशासनाला केले आहे. ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांच्या हस्ते शुक्रवारी विविध आरोग्य सेवांचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी त्यांनी आरोग्य विभागाच्या कारभारावर समाधान व्यक्त करत असताना आरोग्य विभागाच्या तसेच संबंधित पशु वैद्यकीय विभागाच्या निदर्शनास ही गंभीर बाब समोर आणली. महानगरपालिका म्हणून काही गोष्टी तुमच्या लक्षात आणून देऊ इच्छितो असे सांगत खा. म्हस्के यांनी काही खासगी हॉस्पिटल असतील त्यांच्या माध्यमातून काही लोक ठाण्यात येऊन भटके श्वान घेऊन जातात. देवनार या ठिकाणी पाच पाच दहा दिवस त्यांना ठेवले जाते आणि त्यानंतर त्यांचे बेकायदेशीर अवयव प्रत्यारोपण केले जाते, अशी गंभीर माहिती त्यांनी यावेळी पालिका प्रशासनाला दिली. या कामासाठी उत्तर भारतीय टोळी सक्रिय असून त्यांना स्थानिक पेट सेंटर आणि डॉक्टरांची साथ असून हे एकप्रकारे रॅकेट असल्याचे म्हस्के यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे. ठाणे महापालिकेने याकडे गांभीर्याने बघायला हवे. मात्र या गंभीर बाबीकडे प्रशासन जाणूनबुजून दुर्लक्ष करत करत आहे की काय, अशा कानपिचक्या देखील म्हस्के यांनी प्रशासनाला यावेळी दिल्या. यावेळी त्यांनी आरोग्य विभागाच्या कामगिरीवर देखील समाधान व्यक्त केले. ज्याच्यावर सर्वात जास्त टीका होते, असा हा आरोग्य विभाग परंतु टीका होत असेल तरी खचून न जाता काम करणारा हा आरोग्य विभाग असल्याचे त्यांनी सांगितले. आपल्याला आरोग्य विभागात थोडसं चांगल्या पद्धतीने करावा लागेल. आपण जेव्हा सर्जिक इतर डिपार्टमेंट मध्ये कंत्राटी पद्धतीवर जशी माणसे घेतो तसे त्या डिपार्टमेंटमध्ये कंत्राटावर माणसे घ्यावी लागतील, अशा सूचना देखील म्हस्के यांनी यावेळी केल्या.

# कल्याण मुरबाड रोडवर शिवसेना पदाधिकाऱ्याची हत्या; हल्लेखोर फरार



**कल्याण (आकाश कांबळे) :** हल्लेखोर टोळक्यान रस्त्यात गाठून एका शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्याची निर्घुण हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना कल्याण तालुक्यातील मुरबाड महामार्गावर असलेल्या मामणोली गावानजीक घडली आहे. याप्रकरणी कल्याण ग्रामीण तालुका पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास सुरु असून हल्लेखोर फरार झाले आहे. मात्र या हत्याकांडाने एकच खळबळ उडाली असून परिसरात भीतीचे वातावरण पसरेल आहे. किरण घोरड (वय ३२)असे हत्या झालेल्या शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्याच नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार मृतक किरण घोरड हे कल्याण तालुक्यातील गोवेली गावात कुटुंबासह राहत होते. ते कल्याण ग्रामीण भागातील शिंदे शिवसेना गटाचे पदाधिकारी होते. दरम्यान, हत्याकांडाच्या घटनेनंतर गोवेली तसेच मामणोली परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, कुठलीही अनपेक्षित परिस्थिती उद्भवू नये म्हणून पोलिसांनी अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला आहे. काही संशयितांची चौकशी सुरू असून, वैयक्तिक राग, राजकीय वैमनस्य किंवा इतर कारणे यांपैकी कोणते कारण प्रमुख होते, याचा तपास पोलिस पथके करत आहेत. काही महत्त्वाचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागल्याची माहिती मिळत असली तरी अधिकृत माहिती समोर आली नसल्याचेही सांगण्यात आले.

# ५ ते ७ डिसेंबर दरम्यान रंगायतनमध्ये रंगणार संगीतभूषण पं. राम मराठे स्मृती संगीत समारोह



**ठाणे (राकेश गायकवाड) :** ठाणे महानगरपालिकेच्यावतीने ५ डिसेंबर ते ७ डिसेंबर २०२५ या दरम्यान ३०वा संगीतभूषण पं. राम मराठे स्मृती समारोह रंगणार आहे. सायं. ७.०० वा. महोत्सवाची सुरूवात होणार असून रसिकांना शास्त्रीय गायनाबरोबरच कथ्थक नृत्य, संगीत नाटकाची मेजवानी मिळणार आहे. राम गणेश गडकरी रंगायतन येथे हा महोत्सव सुरू राहणार असून विनामूल्य असलेल्या या कार्यक्रमाचा आस्वाद रसिकांनी घ्यावा असे आवाहन महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त १ संदीप माळवी यांनी आज झालेल्या पत्रकार परिषदेत केले. महापालिकेच्या कै. अरविंद पेंडसे सभागृहात झालेल्या पत्रकार परिषदेस अतिरिक्त आयुक्त १ संदीप माळवी, उपायुक्त उमेश बिरारी, पं. मुकुंद मराठे, पं. मुकुंद देव, पं. विवेक सोनार, तबलावादक रवी नवले उपस्थित होते. शुक्रवार ५ डिसेंबर रोजी सायंकाळी ७.०० वा. महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. आपल्या अनेक दशकांच्या समृद्ध गायनप्रवासाने महाराष्ट्राच्या संगीत परंपरेला अमूल्य योगदान देणाऱ्या व आपल्या आवाजातील माधुर्य, श्रुतीसाधना, स्पष्ट उच्चार व भावपूर्ण अभिव्यक्तीमुळे आपण महाराष्ट्राची एक मानबिंदू कलावंत म्हणून ओळख निर्माण करणाऱ्या आशा खाडीलकर यांना संगीतभूषण पं. राम मराठे पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. रोख रुपये ५१,०००/- सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. कथ्थक या अभिजात भारतीय नृत्यप्रकाराच्या युवा साधक म्हणून संगीताची साधना करणाऱ्या निधी प्रभू यांना पं. राम मराठे युवा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. रोख रुपये २५,०००/- सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा रात्री ८.०० वा. होणार आहे. तद्नंतर रात्री ८.३० वा. पं. सुरेश बापट यांच्या गायनाचा कार्यक्रम होणार असून त्यांना तबल्यावर सुहास चितळे व हार्मोनियमवर नीला सोहोनी साथसंगत करणार आहेत. महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी शनिवार दि. ६ डिसेंबर रोजी सायं. ५.००. श्री. राजेंद्र गांगाणी यांचे कथ्थक नृत्य सादरीकरण आहे. रात्री. ८.०० वा. गायिका आरती अंकलीकर यांच्या गायनाचा कार्यक्रम सादर होणार आहे. त्यांना तबल्यावर रोहित देव, तर हार्मोनियमवर सिध्देश बिचोलकर साथसंगत करणार आहे. तर रात्री ९.४५ वा. उस्ताद शाहीद परवेझ यांचा सितारवादनाचा कार्यक्रम होणार असून त्यांना तबल्यावर उन्मेष बॅनर्जी साथसंगत करणार आहेत. तर रविवार ७ डिसेंबर रोजी सकाळी १०.०० वा. वैशाली पोतदार यांच्या नृत्याचा कार्यक्रम सादर होणार आहे. सकाळी ११.०० वाजता सावनी पारेकर यांच्या गायनाचा कार्यक्रम होणार असून त्यांना तबल्यावर अथर्व आठल्ये तर हार्मोनियमवर अमेय गांधी साथसंगत करणार आहे. दुपारी १२.०० वाजता पं. अनंत जोशी यांचा हार्मोनियम वादनाचा कार्यक्रम होणार असून त्यांना समीर गानू, अक्षय अभ्यंकर, अभय दातार साथसंगत करणार आहेत.

**वसई - विरार शहर महानगरपालिका**
प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प.)
मुख्य कार्यालय विरार
दुरध्वनी क्र. १२२५० -२४०२१७९/२४०२५६३

जावक क्र. : व.वि.श.म./क.वि./६५४/२५-२६
दिनांक :- २८-११-२५

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई - विरार शहर महानरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत

हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई - विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ.क्र | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | NL०७/२९ | १९५/८५ | १६७८६ | इंदरा देवी रामराय जैसवाल | अशोक कुमार मिना पुजा कुमारी मिना |
| २ | NL०७/२९ | १८०/१९ | १७१९९ | राऊल रायी | सर्वदानंद पांडये व साक्षी तिवारी |
| ३ | NL०७/२९ | १२२/५७ | १७३७७ | सुयोग सुरेश चव्हाण साझी चव्हाण | उमेश चंद्र रविंद्रनाथ यादव/ संजीव कुमार |
| ४ | NL०७/२९ | १५०/७ | १७६०० | महमुद सलीम खान | महबुब खान |
| ५ | NL०७/३० | ३७१/४६ | १७५२० | मंगेश आर सावेकेकर | प्रवाल मैती |
| ६ | NL०७/३० | ३७०/३९७ | १७५१९ | डी जी एस डेव्हलपर्स | किरण सिंह पवार व मोनिका किरण सिंह पवार |
| ७ | NL०७/३० | ३९४/६५ | १७६०१ | मॅगनम होम मेकर्स प्रा. ली. | मो. ईमराई आदिल |
| ८ | NL०७/३० | ३९३/७२ | १७४०२ | सदाशिव तुकाराम पाटील | विनोद सदाशीव पाटील |
| ९ | NL०७/३० | ३८२/३१ | १७६३२ | आर. जे. डेव्हलपर्स | संतोष मदन दजा सुनम |
| १० | NL०७/२८ | ८९/२७ | १७४०९ | सलमान ए. आर. गोजारिया | मुस्तकीम अहमद जगराल |
| ११ | NL०७/२८ | ८७/९ | १७४१० | सलमान अहमद दापुजी | अबरार अहमद दादुजी |
| १२ | NL०७/२८ | १००/३१ | १७४१९ | साजीद रहीम शेख बिलकीस साजीद शेख | शेलीया नसीमा अब्दुल हक |
| १३ | NL०७/२८ | ५६/६ | १७३८८ | मे. डी. डायाथद लि. | परशुराम जोहार यादव/बिजेस परशुराम यादव |
| १४ | NL०७/२८ | ४७/७ | १७५७५ | विमा उमेश तिवारी/उमेशकुमार तिवारी | कमाल बाश बाबु अब्दुल रहीम सय्यद व अमीनाबी |
| १५ | NL०७/३० | ३७१/२ | १७८५० | गणेश व्ही परब | राकेश हरिशंकर उपाध्याय |
| १६ | NL०७/३० | ३२९/११४ | १७७५८ | महेश नारायण सावंत | प्रकाश शंकर चोरगे / प्रिया प्रकाश चोरगे |
| १७ | NL०७/३० | ४०६/९९ | १७७३८ | अंकीत अनिल खैरे | देवता निर्मल सिंह/ अविनाश निर्मल सिंह/ नवरतन |
| १८ | NL०७/३० | ३२१/२८ | १७७६९ | मुकेश कृष्णा नाचरे | वैजंती विजय अवेरे |
| १९ | NL०७/३० | ३२८/७ | १७७५२ | विनोद कुमार सिताराम कुंहार | घनश्याम शिवराम गोगडे / भाग्यश्री घनश्याम गोगडे |
| २० | NL०७/३० | ३१०/८ | १७७५६ | किरण हसमुख हमीरानी | संगीता सोमनाथ यादव/ रामकेश सोमनाथ यादव |

XXX
( अश्विनी मोरे )
सहाय्यक आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा

# सुधागड तालुक्यात बिबट्याची दहशत



▮ **पाली (सचिन कदम) :** सुधागड तालुक्यात नागशेत व कोशिंबळे परिसरात बिबट्याने पाळीव जनावरांवर हल्ले करून दहशत निर्माण केली आहे. दाट जंगलाला लागून असलेल्या या गावांमध्ये गेल्या काही दिवसांत बिबट्याने तिन जनावरांची हत्या केली असून शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांत नरभक्षक बिबट्याच्या हल्ल्यांची मालिका सुरू असून शेतकरी, ग्रामस्थ तसेच शाळकरी मुलांचेही जीव या हल्ल्यांत गेले आहेत. दरम्यान, कोकणातही बिबट्याचे संचार वाढत आहे. सुधागड तालुक्यात सुद्धा अशाप्रकारे बिबटयांची दहशत वाढत असल्याने परिसरात घाबराट पसरली आहे. बिबट्याच्या जनावरांवरील हल्ल्याच्या बाबतीत शेतकऱ्यांनी वनविभागाला कळविले. त्यानंतर लगेचच सुधागड वनपरिक्षेत्र अधिकारी विशाल सोनवणे, वन्यजीव परिक्षेत्र अधिकारी उमेश जंगम, अनुभवी वनपाल उत्तम किसनराव शिंदे, वनरक्षक समाधान कुटे, पाच्छापूर वनरक्षक सायली महाडिक, पशुधन अधिकारी म्हसकर आणि नांदगाव विभागीय पशुवैद्यकीय अधिकारी यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. शेतकऱ्यांचे झालेले नुकसान तातडीने भरून निघावे म्हणून परिक्षेत्र अधिकारी विशाल सोनवणे यांनी संबंधित कागदपत्रांसह भरपाईचा प्रस्ताव अलिबाग वनविभागाकडे पाठविला आहे. नियमांनुसार लवकरच भरपाई संबंधित शेतकऱ्यांना शासनाच्या मिळेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

### ग्रामस्थांचा पहारा

■ बिबट्याने दोन दुभत्या गाई आणि एका वासराचा बळी घेतला. यापूर्वीही याच परिसरात म्हैस ठार मारल्याची घटना नोंदवली होती. हल्ल्याचे ठिकाणे जंगलाच्या कडेला असलेली गोठ्यांची वस्ती असल्याने बिबट्याचे वारंवार दर्शन आणि आवाज यामुळे ग्रामस्थ रात्रभर जागरण करीत आहेत व पहारा देत आहेत.

### गस्त वाढवली

■ गावकऱ्यांमध्ये पसरलेल्या भीतीचे गांभीर्य लक्षात घेऊनत्या परिसरात वनविभागाचे कर्मचारी नियमित गस्त घालत आहेत. जनावरांच्या संरक्षणासाठी शेतकऱ्यांनी गुरांना बिल्ले (टॅग) लावावेत. सरकारी नियमांनुसार बिल्ला असलेल्या जनावरांवर वन्यप्राण्याचा हल्ला झाल्यासच भरपाई मिळते. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी त्वरित जनावरांना बिल्ले लावावेत, असे आवाहन वन विभागाने केले आहे.

### खबरदारी घेण्याचे आवाहन

■ वनविभागाने ग्रामस्थांना खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. रात्री अनावश्यक घराबाहेर न पडणे, जनावरे सुरक्षित जागी बांधणे, जंगलाच्या कडेला एकटे जाणे टाळणे व काही हालचाल आढळल्यास त्वरित वनविभागाला कळविण्याचे निर्देश दिले आहेत.

# आमदाराच्या मर्सिडीज कारनं चार वर्षाच्या मुलीला चिरडलं, मुलगी गंभीर जखमी




▮ **पुणे (अभिजीत येरल्लू) :** शिरूर तालुक्यातील बोऱ्हाडेमळा परिसरात घडलेल्या एका गंभीर अपघातानं संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आमदाराच्या भरधाव मर्सिडीज कारनं चार वर्षीय चिमुकलीला जबर धडक दिल्याची धक्कादायक घटना समोर आली. पुणे-अहिल्यानगर महामार्गावर शनिवारी दुपारी हा अपघात घडला. चिमुकली या अपघातात गंभीर जखमी झालीय. घटनेचं सीसीटीव्ही फुटेजदेखील समोर आलंय. त्यात रस्ता ओलांडत असताना वाघोलीहून शिरूरकडं येत असलेल्या काळया रंगाच्या मर्सिडीज (MH १२ XW १३९१) कारनं तिला जोरदार धडक दिल्याचं स्पष्ट दिसतंय. धडक इतकी भीषण होती की, चिमुकली अक्षरशः चेंडूसारखी हवेत उडून काही फुटांवर जाऊन रस्त्यावर पडली. अपघातात तिचे दात पडणे, जबड्याला गंभीर दुखापत तसंच चेहऱ्यावर खोल जखमा झाल्या आहेत, अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य केलं. मुलीला ताबडतोब शिरूर येथील वात्सल्य हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलं. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर गंभीर अवस्थेतील मुलीला तातडीनं पुणे येथील केएम हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आलं. सध्या तिच्यावर उपचार सुरू असून, परिस्थिती नाजूक असल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान, या अपघातानंतर शहरात वेगवेगळया चर्चांना उधाण आलंय. "आमदाराच्या गाडीनं मुलगी जखमी" असा विषय सर्वत्र चर्चेत असूनही पोलीस प्रशासनाच्या प्रतिक्रिया मात्र आश्चर्यकारक होत्या. "रुग्णालयाकडून माहिती मिळालेली नाही. तक्रार देण्यासाठी कोणी आलेलं नाही" अशा प्रतिक्रिया अधिकाऱ्यांकडून देण्यात आल्या. त्यामुळे घटना लपवण्याचा प्रयत्न झाला का? आमदारांच्या दबावामुळे पोलीस तपासात ढिलाई केली जात आहे का? याबाबत नागरिकांत संताप व्यक्त होत आहे.

# नूतन वर्षापासून ट्रॅव्हल्स बसेसकडून मनपाला प्रतिवर्षी २०.७२ लाखांचा महसूल



▮ **नाशिक (महेश पानसरे) :** द्वारका व मुंबई नाका परिसरात सर्व्हिस रोडवर उभ्या असलेल्या ट्रॅव्हल्स बसेसमुळे होणारी वाहतूक कोंडी, अपघात रोखण्यासाठी तपोवनातील सिटीलिंकच्या बस टर्मिनलवर जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला आहे. यासाठी नाशिक बस ओनर्स अ‍ॅण्ड ऑपरेटर संघटनेला भाडेतत्वावर जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. यामाध्यमातून महापालिकेला प्रतिवर्षी २०.७२ लाखांचा महसूल मिळणार आहे. नाशिक बस ओनर्स अ‍ॅन्ड ऑपरेटर संघटनेने बस थांब्यासाठी महापालिकेकडे जागेची मागणी केली होती. त्यानुसार पंचवटीतील तपोवनातील सिटीलिंक बस टर्मिनलमधील ४ हजार ३११ चौरस मीटर क्षेत्र चालू बाजारभावानुसार २.५० टक्के दराने जीएसटीसह भाडेतत्वावर उपलब्ध करून दिले जाणार आहे. उच्च न्यायालयातील जनहित याचिकेतील अंतरीम आदेशानुसार महापालिकेतील मिळकती नाममात्र वा विनामोबदला दराने भाडेपट्ट्याने देऊ नये, असे निर्देश आहेत. त्यानुसार भाडे आणि सुरक्षा ठेव निर्धारण समितीच्या बैठकीत मिळकतीच्या मूल्यांकनाचे आधारभूत दर २.५० टक्के दराने देण्यास समितीने मान्यता दिली आहे. त्यानुसार मिळकतीच्या ४ हजार ३११ चौ. मी. क्षेत्रासाठी वार्षिक भाडे १७,५६,७३३ आणि १८ टक्के जीएसटी ३,१६,२१२ प्रमाणे एकूण वार्षिक २०,७२,९४४ इतके वार्षिक भाडेमूल्य ठरवण्यात आले आहे. संघटनेने भाडेमूल्य भरण्यास संमती दिल्याचे प्रस्तावात नमूद आहे. नाशिक बस ओनर्स अ‍ॅण्ड ऑपरेटर संघटनेकडून तीन महिन्याच्या आगाऊ भाड्याची रक्कम सुरक्षा अनामत म्हणून घेतली जाणार आहे. भाडेकरारनामा करण्यात येणार आहे. मात्र, सिंहस्थ कुंभमेळा कालावधीत ही मिळकत महापालिकेच्या वापरासाठी मोकळी करून द्यावी लागणार असल्याची अट ठेवण्यात आली आहे. द्वारका आणि मुंबई नाका या दोन्ही ठिकाणी दिवसभर मोठ्या प्रमाणावर वाहतूक असते. खासगी ट्रॅव्हल्स बसचालकांकडून या परिसरात प्रामुख्याने सर्व्हिसरोडवर बसेस उभ्या केल्या जातात. त्यामुळे मोठी वाहतूक कोंडी निर्माण होते. आता, या बसेसना तपोवनात थांबा मिळाल्यास वाहतूक कोंडीचा प्रश्न निकाली निघण्यास मदत होणार आहे.

# राज्यात एसटीचे ६१ लाख प्रवासी घटले, मात्र सांगली विभागात ४ लाख वाढले




▮ **सांगली (महेश पानसरे) :** राज्यात ऑक्टोबरमध्ये राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे ६१ लाख प्रवासी घटल्याने एसटीला मोठ्या तोट्यास सामोरे जावे लागले. मात्र, सांगली विभागाने दिवाळीमध्ये केलेल्या सुयोग्य नियोजनामुळे ऑक्टोबरमध्ये ४ लाख ८३ हजार प्रवासी वाढले. राज्यात एसटी पीछाडीवर असली, तरी सांगली विभागाने मात्र प्रवाशांची मने जिंकत त्यांची संख्या वाढवण्यात आघाडी घेतली आहे. यंदाच्या ऑक्टोबरमध्ये सांगली विभागाने विविध कल्पक गोष्टी राबवत आणि नियोजनावर भर देत गर्दीच्या मार्गावर वाहने वाढवली. शटल सेवांच्या फेऱ्यांमध्ये वाढ केली. ग्रामीण वाहतुकीवर भर दिला. प्रवाशांची गैरसुविधा टाळली, याचे फळ त्यांना मिळाले असून, विभागाला अधिक फायदा मिळविण्यात यश आले आहे. सांगली विभागीय कार्यालयातील विभाग नियंत्रक सुनील भोकरे, विभागीय वाहतूक अधिकारी (प्र.) सतीश पाटील, सहायक वाहतूक अधीक्षक (चालान) प्रवीण डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध आगारांतील आगारप्रमुख, वाहतूक निरीक्षकांनी प्रयत्नपूर्वक विभागासाठी सामूहिक यश प्राप्त केले.

**गतवर्षीच्या तुलनेत विविधस्तरावर वाढ**

■ स्तर / ऑक्टोबर २०२४ / ऑक्टोबर २०२५ / यंदाची वाढ

■ उत्पन्न / २० कोटी ७६ लाख ४८ हजार / २५ कोटी २ लाख २७ हजार / ४ कोटी २५ लाख ७९ हजार

■ प्रवासी संख्या / ८४ लाख ९७ हजार / ८९ लाख ८० हजार / ४ लाख ८३ हजार

■ किलोमीटर / ७३ लाख ५४ हजार / ७७ लाख ३२ हजार / ३ लाख ७८ हजार

**गर्दीच्या मार्गावर कार्यरत फेऱ्यांमध्ये अधिकची वाढ**

■ मार्ग / फेऱ्या
■ सांगली - कोल्हापूर / ८
■ सांगली - इचलकरंजी / १२
■ मिरज - कोल्हापूर / ४
■ मिरज - इचलकरंजी / ६
■ ईश्वरपूर - कोल्हापूर / ८
■ आटपाडी - सांगली / ४
■ तासगाव - सागंली /६
■ विटा - सांगली / ४
■ जत - सागंली / ६
■ पलूस - सांगली / ४

**आगारनिहाय प्रतिदिवस सरासरी वाहनाचा वापर**

■ ८५, मिरज : ८०, विटा : ७३, ईश्वरपूर : ७०, तासगाव : ६७, जत : ७६, आटपाडी : ५५, कवठेमहांकाळ : ५९, शिराळा : ५०, पलूस : ३८, एकूण : ६५३

**प्रवासीसंख्या वाढविण्यासाठी केलेले प्रयत्न**

■ लांब व मध्यम फेऱ्यांच्या वाहतुकीत वाढ केली.
■ पुणे वाहतुकीसाठी जादा १५०, तर मुबंई वाहतुकीसाठी जादा १० वाहनांची सोय.
■ आरक्षण नोंदणीची वेळ वाढवली.
■ रातराणी वाहतुकीत वाढ.
■ वाहनांच्या बिघाडांची संख्या रोखण्यात यश
■ मनुष्यबळाचे सुयोग्य नियोजन
■ पर्यवेक्षक अधिकाऱ्यांना मार्गनिहाय फेऱ्यांचे पालकत्व सोपवले.
■ व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे विभागप्रमुखांचे आगारप्रमुखांना वेळोवेळी मार्गदर्शन.

> " सांगली विभागीय कार्यालयाने सर्व १० आगारांचे विविध पातळ्यांवर सुयोग्य नियोजन केले होते. प्रवासी मागणीनुसार, गर्दीच्या व ग्रामीण मार्गावर वाहने व त्यांच्या फेऱ्यांमध्ये वाढ केली. उपलब्ध मनुष्यबळाचा योग्य वापर केला गेला. आगारस्तरावर चांगला प्रतिसाद मिळाला. चालक, वाहक व अधिकारी यांच्या मेहनतीमुळे विभागाला प्रवासी संख्या वाढविण्यात यश मिळाले.
>
> - सुनील भोकरे, विभाग नियंत्रक, सांगली

# वादळी वारा, अजस्त्र लाटांमुळे नौका मासेमारीविना माघारी



▮ **रत्नागिरी (धनश्री सट्टा) :** हवामान विभागाने पाच दिवसांचा धोक्याचा इशारा दिला होता. २५ नोव्हेंबर ते २९ नोव्हेंबरपर्यंत समुद्रात मासेमारीसाठी न गेलेल्या नौका धोक्याच्या इशाऱ्याची मुदत संपल्यानंतर मासेमारीसाठी गेल्या, परंतु मासळीच मिळत नसल्याने आणि समुद्रात मोठ्या लाटा उसळणे आणि वाऱ्यामुळे मच्छीमार नौका मासेमारी अर्धवट सोडून बंदरात येत आहेत. हवामान विभागाने २५ नोव्हेंबर ते २९ नोव्हेंबरपर्यंत धोक्याचा इशारा दिला होता. या पार्श्वभूमीवर मत्स्य व्यवसाय विभागाने मच्छीमारांना सजग केले. धोक्यामुळे अनेक मच्छीमार नौका समुद्रात मासेमारीसाठी गेल्या नाहीत. धोक्याच्या इशाऱ्याची मुदत संपल्यानंतर रविवारी सकाळी समुद्रात गेलेल्या नौका पुन्हा संध्याकाळीच बंदरात परत आल्या. वाऱ्यासोबत समुद्रात उसळणाऱ्या उंच लाटा आणि मासे मिळत नसल्याने नौका मासेमारी अर्धवट सोडूनच परतत असल्याचे मच्छीमार सचिन खेत्री यांनी सांगितले. रोजचा ५० ते ६० हजार रुपये खर्च असताना केवळ चार-पाच टपच मासळी मिळत असल्याचेही त्यांनी सांगितले. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये सुमारे साडेतीन हजारपेक्षा अधिक मच्छीमार नौका आहेत. या नौकांनी रविवारपासून मासेमारी करण्यास सुरूवात केली. परंतु श्रीलंकेतील गितवाह वादळ भारताच्या दिशेने येत असल्याने समुद्रात उंच लाटा उसळून जोरदार वारे वाहत असल्यानेच मासळी मिळत नसावी असा अंदाज मच्छीमारांनी व्यक्त केला. धोक्याच्या इशाऱ्यामुळे गेल्या साडेतीन महिन्यात अनेक वेळा मासेमारी नौका समुद्रात जाऊ शकलेल्या नाहीत. त्यात पुन्हा २५ ते २९ नोव्हेंबरपर्यंतच्या पाच दिवसांची भर पडली. या इशारा कालावधीत बहुसंख्य नौका बंदरातच होत्या.

# विहिरीत मृतावस्थेत आढळला कोल्हा! ग्रामस्थांना उलट्या, ताप आणि पोटदुखीच्या समस्या



▮ **गुहागर (भावना जैन) :** गुहागर तालुक्यातील झोंबडी काजळीवाडी येथे पिण्याच्या पाण्याच्या विहिरीत एक कोल्हा पडून मृत अवस्थेत आढळला. बराच काळ मृतदेह पाण्यात राहिल्यामुळे तो पूर्णपणे सडू लागला असून त्याला किडे व जंतूही पडले होते. त्यामुळे विहिरीचे पाणी पूर्णपणे दूषित झाले असून परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. हेच पाणी ग्रामस्थ पिण्यासाठी वापरत असल्याने ताप, उलट्या, जुलाब आणि पोटदुखीची लक्षणे दिसू लागली आहेत. गंभीर आजारांचा धोका निर्माण झाल्याने गावात भीतीचे वातावरण पसरले होते. घटनेची माहिती मिळताच झोंबडी ग्रामपंचायतीचे सरपंच अतुल लांजेकर, उपसरपंच प्रणाली पवार, सदस्या मयुरी लांजेकर, ग्रामसेवक गोरख सोनवणे, दिपक गायकवाड आणि आशा साक्षी सरदेसाई यांनी त्वरित घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. ग्रामस्थांना सोबत घेऊन विहिरीच्या स्वच्छतेचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले. गटविकास अधिकारी शेखर भिल्लारे आणि कार्यकारी अभियंता दिप्ती धारप यांच्याशी संपर्क साधल्यानंतर सहाय्यक अभियंता गिरीश पापरकर व पवार यांनीही ठिकाणी भेट देऊन पाहणी केली. मृत कोल्हा बाहेर काढून विहिरीची स्वच्छता, निर्जंतुकीकरण आणि पाण्याची प्रयोगशाळा तपासणी तात्काळ सुरू करण्यात आली आहे. संभाव्य साथरोगाचा धोका लक्षात घेऊन वैद्यकीय अधिकारी डॉ. सुप्रीम कांबळे, कळवली आरोग्य केंद्रातील वैभव जाधव व मदन जानवळकर यांच्या उपस्थितीत काजळीवाडी येथे तात्काळ आरोग्य तपासणी कॅम्प आयोजित करण्यात आला. ग्रामस्थांच्या आरोग्याची सतत निगराणी करण्यात येत आहे. सरपंच अतुल लांजेकर स्वतः प्रत्यक्ष उपस्थित राहून ग्रामस्थांची काळजी घेत आहेत. या कामात सुरेश पालशेतकर, शैलेश सावर्डेकर, नंदेश सावर्डेकर, संतोष शिरकर, महेंद्र पालशेतकर, स्वप्नील आंबोवकर, गणेश पालशेतकर, देवदास पालशेतकर, केशव शिरकर, आशिष सावर्डेकर, उत्कर्ष सेवा मंडळ आणि स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहकार्य करत आहेत.

# रायगड मधील अडीच लाख मतदार ठरविणार पालिकांचे कारभारी



▮ **रायगड (सचिन कदम) :** दोन डिसेंबर रोजी होणाऱ्या नगर परिषदांच्या निवडणुकीसाठी शासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. मतदानापासून मतमोजणीपर्यंत लागणाऱ्या सर्व कामकाजाचे प्रशिक्षण कर्मचाऱ्यांना देण्यात आले असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली. सुमारे दोन हजारांहून अधिक कर्मचारी या निवडणुकीच्या कामासाठी लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे. जिल्ह्यातील अलिबाग, खोपोली, श्रीवर्धन, मुरूड-जंजिरा, रोहा, महाड, पेण, उरण, कर्जत, माथेरान या नगरपरिषदांमध्ये नगराध्यक्षपदासाठी ३४ आणि नगरसेवकपदासाठी ५९५ असे एकूण ६२९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. या नगरपरिषदांच्या हद्दीत १०७ प्रभाग आहेत. नगराध्यक्षपदाच्या दहा आणि नगरसेवकपदाच्या २१७ जागांसाठी ही निवडणूक होणार आहे. खोपोलीमध्ये नगराध्यक्षपदासाठी सात व नगरसेवकपदासाठी ११८, अलिबागमध्ये नगराध्यक्षपदासाठी दोन व नगरसेवक पदासाठी ४२, श्रीवर्धनमध्ये नगराध्यक्षपदासाठी चार आणि नगरसेवक पदासाठी ६०, मुरूडमध्ये नगराध्यक्ष पदासाठी तीन व नगरसेवक पदासाठी ५८, रोहामध्ये नगराध्यक्षपदासाठी दोन व नगरसेवकपदासाठी ५१, महाडमध्ये नगराध्यक्षपदासाठी पाच व नगरसेवक पदासाठी ५३, पेणमध्ये नगराध्यक्ष पदासाठी तीन व नगरसेवक पदासाठी ७२, उरणमध्ये नगराध्यक्षपदासाठी चार आणि नगरसेवक पदासाठी ४९, कर्जतमध्ये नगराध्यक्षपदासाठी दोन आणि नगरसेवक पदासाठी ४६, माथेरानमध्ये नगराध्यक्षपदासाठी दोन व नगरसेवक पदासाठी ४६ उमेदवार आहेत. निवडणूक प्रचाराला आता अवघे तीन दिवस बाकी आहेत. त्यामुळे उमेदवार आपापल्या प्रभागात प्रचार करण्यात मग्न आहेत. मतदारांच्या भेटी कडे सर्वांचा कल जास्त आहे. मतदानासाठी त्यांना आवाहन करणे. काही कारणानिमित्त बाहेर असणाऱ्या मतदारांशी बोलून त्यांना मतदानाला येण्यासाठी पाठपुरावा करणे. अशा गोष्टीं उमेदवार करीत आहेत. ३० नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ५ वाजता प्रचार संपणार आहे. आरोप-प्रत्यारोपांसह वेगवेगळे व्हिजन घेऊन ही निवडणूक लढविण्यासाठी सर्वच राजकीय पक्षाचे उमेदवार कामाला लागले आहे. निवडणूक प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली आहे. मतदान दोन डिसेंबरला होणार असून, ३०८ केंद्रांमध्ये ही प्रक्रिया पार पडणार आहे. दोन लाख ३७ हजार ५०३ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. तीन डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासाकडून तयारी जोरात सुरु केली आहे. मतदान केंद्रांची पाहणी करण्यापासून कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहेत. जिल्ह्यातून सुमारे दोन हजार कर्मचारी मतदान व मतमोजणीच्या कामासाठी लागण्याची शक्यता आहे. तसेच या कालावधीत कोणताही गैरप्रकार घडू नये, म्हणून पोलीस यंत्रणेकडून देखील दक्षता घेण्यात आली आहे.

### अलिबागमध्ये १९ केंद्रांमध्ये होणार मतदान

■ अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेसच्या उमेदवार अक्षया प्रशांत नाईक आणि महायुतीमधील एक असे दोघेजण रिंगणात आहेत. नगरसेवकपदाच्या २० जागांमध्ये एक जागा बिनविरोध जाहीर झाली आहे. महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेसचे उमेदवार प्रशांत नाईक बिनविरोध निवडून आले. त्यामुळे आता नगरसेवक पदाच्या १९ जागांसाठी ४२ उमेदवारांमध्ये लढत होणार आहे. अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणुकीचे मतदान १९ केंद्रांमध्ये होणार आहे. १६ हजार ३५४ मतदार मतदानाचा हक्क बजाणार आहेत. २६ नोव्हेंबरला चिन्ह वाटप केले जाणार असून, २८ नोव्हेंबरला पेट्या सिलींग केल्या जाणार आहेत. मतपेट्या सुरक्षित ठेवण्यासाठी स्ट्राँग रुम तयार करण्यात आल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.
E-mail-northmumbai.ee@mahapwd.com
दुरध्वनी क्रमांक .०२२-२६२३११६४ फॅक्स - २६२०५७८८

**ई -निविदा सुचना क्र. ४१ सन २०२५-२०२६**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक- २६२३११६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https//mahatenders.gov.in व www.mahapwd.com येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां.) मंडळ, फोर्ट, मुंबई तसेच कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, अंधेरी (प.), मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचेनांव | अंदाजित रक्कम |
| --- | --- | --- |
| १ | राज्य राखीव पोलिस बल गट क्र. ८ गोरेगाव पूर्व येथील सार्वजनिक शौचालय ते अपर पोलिस महासंचालक कार्यालयापर्यंतच्या रस्त्याचे नूतनीकरण करणे. | रु.१,३९,७९,६४४/- |

टिप: वरिल "ई " निविदा सूचना https//mahatenders.gov.in व www.mahapwd.com येथे पहावयास तसेच डाऊनलोड करावयास मिळेल. सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास या वेबसाईटवर कळविण्यात येईल.

| | | |
| --- | --- | --- |
| १ | ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. | २६/११/२०२५, सकाळी ०९.४५ ते दि ०४/१२/२०२५ सायं १७.०० पर्यंत |
| २ | ई-निविदा उघडणे- दि. | ०५/१२/२०२५. सायं १७.०० वाजता |

जा.क्र.काअ/उमुंवि/निविदा/ ७६१०
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.
दिनांक :- 20 NOV 2025

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग,
अंधेरी, मुंबई.

आरओसी - 2025-26/क्र- 5/C४२३०



# राज्यपालांच्या हस्ते अनुपम खेर यांना डीएव्ही रत्न पुरस्कार प्रदान

**वृत्तसंस्था :** शिमला येथील डीएव्ही पब्लिक स्कूलचे माजी विद्यार्थी असलेले प्रसिद्ध अभिनेते अनुपम खेर यांना राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते डीएव्ही रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राजभवन येथे राज्यपालांच्या हस्ते डीएव्ही व्यवस्थापन समितीतर्फे संस्थेच्या प्रथितयश माजी विद्यार्थ्यांचा सत्कार नुकताच करण्यात आला. राज्यपालांनी यावेळी सर्व माजी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच विविध क्षेत्रांच्या माध्यमातून देशाला योगदान देत असल्याबद्दल त्यांना कौतुकाची थाप दिली. शिमला येथील डीएव्ही पब्लिक स्कूल येथे आपण पहिली ते अकरावी इतकी वर्षे शिक्षण घेतले. या संस्थेने आपल्याला भारतीय मूल्ये तसेच देश भक्तीचे संस्कार दिले, असे सांगताना आपल्या जीवनात डीएव्ही पब्लिक स्कूलचे महत्व अनन्य साधारण असल्याचे अनुपम खेर यांनी सांगितले. त्या काळातले शिक्षक विद्यार्थ्यांना कठोर शिक्षा द्यायचे, परंतु ते प्रेम व संस्कार देखील द्यायचे असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला राज्यपालांच्या पत्नी दर्शना देवी, डीएव्ही कॉलेज व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पूनम सुरी, डीएव्हीच्या संचालिका डॉ. निशा पेशीन तसेच संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.



# 'कांतारा'मधील 'या' सीनची नक्कल करून चांगलाच अडकला रणवीर

## धार्मिक भावना दुखावल्याबद्दल झाला ट्रोल

**वृत्तसंस्था :** अभिनेता रणवीर सिंग त्याच्या आगामी "धुरंधर" चित्रपटापूर्वी अडचणीत सापडला आहे. सोशल मीडियावर त्याला ट्रोल केले जात आहे. "कांतारा चॅप्टर १" चित्रपटातील एका सीनची नक्कल केल्यामुळे ही घटना घडली आहे. अलिकडेच, भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (IFFI २०२५) रणवीरने ऋषभ शेट्टी अभिनीत "कांतारा २" चित्रपटातील एका दृश्याची नक्कल केली. त्याने देवी चावुंडी (चामुंधा) ची खिल्ली उडवल्याचा आरोप आहे. त्यानंतर, सोशल मीडियावर त्याला ट्रोल केले जात आहे. रणवीर सिंगने नुकतेच गोव्यात झालेल्या IFFI २०२५ मध्ये हजेरी लावली. "कांतारा" फेम कन्नड अभिनेता-दिग्दर्शक ऋषभ शेट्टी देखील उपस्थित होते. गेल्या शुक्रवारी समारोप समारंभात रणवीरने ऋषभ शेट्टीचे भरभरून कौतुक केले. त्याने "कांतारा ३" मध्ये काम करण्याची इच्छाही व्यक्त केली आणि चित्रपटातील एका दृश्याची नक्कलही केली. त्याचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यामध्ये वापरकर्त्यांनी धार्मिक भावना दुखावल्याबद्दल रणवीरवर टीका केली आहे. व्हायरल व्हिडिओमध्ये, रणवीर सिंग अभिनेता ऋषभला 'कांतारा' चित्रपटाबद्दल बोलताना दिसतो आहे, तो म्हणाला, "मी हा चित्रपट थिएटरमध्ये पाहिला आणि मला तुमचा अभिनय खूप आवडला. विशेषतः तो सीन जिथे स्त्री तुमच्या शरीरात प्रवेश करते." त्यानंतर रणवीर त्या दृश्याची नक्कल करतो. तो लोकांना विचारतो, "कोणी मला 'कांतारा ३' मध्ये पाहू इच्छितो का?" ऋषभ शेट्टीकडे बोट दाखवत तो म्हणतो, "या व्यक्तीला सांगा." रणवीरच्या व्हिडिओवर नेटिझन्स प्रतिक्रिया देत आहेत आणि त्यांची नाराजी व्यक्त करत आहेत. बहुतेक वापरकर्ते रणवीरच्या मिमिक्रीवर आक्षेप घेत आहेत, ते अनादराचे म्हणत आहेत आणि असे करून त्याने देवाचा अपमान केला आहे असेही म्हणत आहेत. आता रणवीर या प्रकरणामुळे चांगलाच अडचणीत आला आहे.

# कन्नड अभिनेते उमेश यांचे वयाच्या ८० व्या वर्षी निधन, 'या' गंभीर आजराने होते ग्रस्त

**वृत्तसंस्था :** कन्नड चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते उमेश यांचे वयाच्या ८० व्या वर्षी निधन झाले आहे. ते बऱ्याच काळापासून आरोग्याच्या समस्यांशी झुंजत होते. यकृताच्या कर्करोगाशी झुंज देत त्यांचे निधन झाले. त्यांनी अखेरचा श्वास घेत चाहत्यांचा निरोप घेतला आहे,



अभिनेत्याच्या जाण्याने कन्नड चित्रपटसृष्टीला मोठा धक्का बसला आहे. तसेच आता त्यांचे संपूर्ण कुटुंब आणि त्यांचे चाहते त्यांना श्रद्धांजली वाहत आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून ते यकृताच्या कर्करोगावर उपचार घेत होते. कन्नड चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते आणि विनोदी कलाकार एमएस उमेश यांचे रविवारी निधन झाले. काही दिवसांपूर्वी ते घरी पडले होते आणि त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. शस्त्रक्रियेदरम्यान डॉक्टरांना यकृताचा कर्करोग आढळला. कर्करोगावर उपचार सुरू झाले. यकृताच्या कर्करोगाशी जीवघेण्या लढाईत त्यांनी रविवारी वयाच्या ८० व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. उमेशने त्यांच्या अभिनय कारकिर्दीत ३५० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले होते. त्यांनी रजनीकांतसह इतर अनेक प्रमुख दक्षिण भारतीय कलाकारांसोबत काम केले होते. कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री आणि खासदार एचडी कुमारस्वामी यांनी त्यांच्या ट्विटर अकाउंटवर अभिनेते उमेश यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. त्यांनी लिहिले की, "प्रसिद्ध विनोदी कलाकार श्री एमएस उमेश यांच्या निधनाचे वृत्त ऐकून मला खूप दुःख झाले आहे. उमेश त्यांच्या विनोदाने प्रेक्षकांना हास्य देत असत. ते कन्नड चित्रपट उद्योगाला पुढे नेणारे अभिनेते होते." असे म्हणत त्यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. कन्नड अभिनेत्याच्या मुलीने सांगितले आहे की उमेश यांचे अंत्यसंस्कार रविवारी होतील. ते तिच्या वडिलांचे पार्थिव रुग्णालयातून घरी घेऊन जात आहेत. त्यानंतर ते अधिक माहिती चाहत्यांना देखील आहेत. अभिनेते उमेश यांनी अनेक कन्नड कॉमेडी चित्रपटामध्ये काम केले आहे. आणि चाहत्यांचे मनोरंजन केले आहे. अभिनेते जरी आज आपल्यात नसले तरी त्यांच्या आठवणी चाहत्यांच्या मनात नेहमीच जिवंत राहणार आहेत.

# 'लक्ष्मीच्या पावलांनी' घेणार निरोप?

**वृत्तसंस्था :** स्टार प्रवाह वाहिनेच्या मालिका चाहत्यांसाठी एक दुःखाची बातमी आहे. स्टार प्रवाहवर प्रसिद्ध होऊन राज्यभरातील प्रेक्षकांमध्ये नाव कमावणारी मालिका 'लक्ष्मीच्या पावलांनी' आता बंद होणार आहे, अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे. अगदी काही दिवसांपूर्वीच मालिकेतील मुख्य पात्र सांभाळणाऱ्या इशा केसकरने या मालिकेतून Exit घेतली होती. त्या घटनेच्या काही आठवड्यातच मालिकाही आता निरोप घेण्याच्या उंबरठ्यावर दिसत आहे. पण याची काही अधिकृत माहिती अद्याप समोर आली नाही. पुढील महिन्यात वाहिनेवर नवीन मालिका टेलिकास्ट होणार आहे. 'वचन दिले तू मला' या मालिकेच्या एन्ट्रीमुळे 'लक्ष्मीच्या पावलांनी' या मालिकेच्या वेळेवर परिणाम होईल की संपूर्ण मालिकेवरच परिणाम होईल? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. दरम्यान, स्टार प्रवाहवर टेलिकास्ट होणाऱ्या नवीन मालिका 'वचन दिले तू मला' या मालिकेत 'ऊर्जा' आणि 'शौर्य' ही जोडी पाहायला मिळणार आहे. अभिनेत्री अनुष्का सरकटे आणि अभिनेता इंद्रनील कामत या मालिकेत मुख्य भूमिकेत दिसून येणार आहेत. तर अभिनेता मिलिंद गवळी खलनायकाच्या भूमिकेत दिसून येणार आहे. अभिनेत्री ईशा केसकर 'लक्ष्मीच्या पावलांनी' या मालिकेतून बाहेर गेली असून आता मालिकाच प्रेक्षकांचा निरोप घेते काय? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. दरम्यान, इशा केसकरच्या मालिकेतील Exit नंतर तिच्या काव्या या पात्राला मालिकेत ठार मारण्यात आले आहे आणि सुकन्या नावाच्या नव्या पात्राची Entry मालिकेत करण्यात आली होती. सलग दोन वर्षे काम करत असताना, जूनमध्ये माझ्या डोळ्याला फोड आला होता. तरीही मी चित्रीकरण सुरूच ठेवले. पण दुखापत वाढत गेल्यामुळे डॉक्टरांनी काही दिवस पूर्ण विश्रांती घेण्याचा सल्ला दिला. आता विश्रांती घेतली नाही तर पुढे छोटीशी शस्त्रक्रिया करावी लागू शकते आणि त्यानंतर १५-२० दिवस सूर्यप्रकाशही पाहू शकणार नाही, असे त्यांनी सांगितले. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन मी मालिका सोडण्याचा निर्णय घेतला. सप्टेंबरमध्येच या निर्णयाची माहिती मी टीमला दिली होती, असे ईशा म्हणाली.



# अंकिता वालावलकरनेच नाही तर 'या' लोकांनी पत्रिकेत नाव टाकूनही सूरज चव्हाणच्या लग्नाकडे फिरवली पाठ

**वृत्तसंस्था :** 'बिग बॉस मराठी सीझन ५' चा लाडका विजेता आणि लाखो प्रेक्षकांच्या गळ्यातील ताईत असलेला सूरज चव्हाण २९ नोव्हेंबर रोजी विवाहबंधनात अडकला. टिकटॉक रीलपासून 'बिग बॉस'च्या ट्रॉफीपर्यंतचा प्रवास गाजवणाऱ्या सूरजने पुण्याजवळील सासवड येथे मोठ्या थाटामाटात पारंपरिक पद्धतीने संजना गोफणे हिच्याशी लग्न केले. संजना ही सूरजच्या चुलत मामाची मुलगी असून हे 'अरेंज मॅरेज' आहे. सूरजच्या लग्नात जान्हवी किल्लेकर त्याची करवली बनली होती. सूरजच्या लग्नाला बिग बॉस मराठीच्या घरात त्याच्यासोबत असलेल्या काही मोजक्या कलाकारांव्यतिरिक्त अनेक जण गैरहजर राहिले. सध्या त्यांच्या नावाची जोरदार चर्चा होताना दिसत आहे. गरीब कुटुंबातून आलेल्या, पण साध्या स्वभावामुळे महाराष्ट्राच्या घराघरात पोहोचलेल्या सूरजच्या





लग्नाबद्दल प्रेक्षकांना मोठी उत्सुकता होती. त्याच्या लग्नसोहळयापूर्वीचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल झाले होते. परंतु, एवढा मोठा टप्पा गाठणाऱ्या सूरजच्या आयुष्यातील या महत्त्वाच्या क्षणाला काही अत्यंत जवळचे आणि महत्त्वाचे पाहुणे मात्र उपस्थित राहू शकले नाहीत, ज्यामुळे अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले. जिथे अनेक जवळचे लोक गैरहजर राहिले, तिथे 'बिग बॉस'मधील त्याची मैत्रीण जान्हवी किल्लेकर मात्र आवर्जून हजर राहिली. 'बिग बॉस'मध्ये जान्हवीने सूरजला वचन दिले होते की, "तुला जेव्हा माझी गरज असेल तेव्हा मी हजर असेन." तिने ते वचन पाळले. लाडक्या भावाच्या लग्नात जान्हवी नटूनथटून 'करवली' म्हणून मिरवताना दिसली, ज्यामुळे सूरजला मोठा आधार मिळाला. 'बिग बॉस'च्या घरातूनच सूरजला भाऊ मानणारी अंकिता वालावलकर ही लग्नाला गैरहजर होती. तिने लग्नापूर्वी सूरज आणि संजनाचे 'केळवण' केले होते, तसेच खरेदीलाही ती सोबत होती. त्यामुळे तिची अनुपस्थिती अनेकांना खटकली. त्यामुळे ती चांगलीच ट्रोल झाली. 'बिग बॉस'च्या मंचावर सूरज आणि होस्ट रितेश देशमुख यांच्यात एक खास आणि भावनिक नाते निर्माण झाले होते. इतकेच नाही तर, रितेशने सूरजची आर्थिक फसवणूक होऊ नये म्हणून त्याला मदत केली होती आणि त्याच्या पहिल्या चित्रपट 'झापुक झुपूक' चा ट्रेलरही लॉन्च केला होता. लग्नपत्रिकेत रितेशचे नाव होतं. पण तो सध्या आपल्या आगामी चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त असल्याने तो या सोहळयाला हजेरी लावू शकला नाही. सूरजच्या 'झापुक-झुपूक' चित्रपटाचे दिग्दर्शक केदार शिंदे यांचेही सूरजसोबत खास नाते आहे. पण, तेही पुढील चित्रपटाच्या कामात व्यग्र असल्यामुळे लग्नाला येऊ शकले नाहीत. सूरजने स्वतः उपमुख्यमंत्री अजित पवार यांना जाऊन लग्नाचे निमंत्रण दिले होते. विशेष म्हणजे, लग्नानंतर सूरज ज्या नव्या घरात गृहप्रवेश करणार आहे, ते घरही अजित दादांनीच बांधून दिले आहे. मात्र, बीड दौऱ्यामुळे दादांना लग्नाला येता आले नाही. सध्या सोशल मीडियावर सूरज आणि संजनाच्या लग्नाच्या सुंदर फोटोंची धूम आहे. आपल्या नव्या आयुष्याच्या या टप्प्यात सूरजला सगळ्यांकडून खूप शुभेच्छा मिळत आहेत.

# भारताचा रंगतदार सामन्यात १७ धावांनी विजय, दक्षिण आफ्रिकेची कडवी झुंज अपयशी

**वृत्तसंस्था :** पाहुण्या दक्षिण आफ्रिकेने रांचीत टीम इंडिया विरुद्ध ३५० धावांचा पाठलाग करताना शेवटच्या ओव्हरपर्यंत जोरदार झुंज दिली. टीम इंडियाने विराट कोहली याच्या शतकाच्या जोरावर ३४९ धावा केल्या. त्यामुळे टीम इंडिया हा सामना सहज जिंकेल, असा विश्वास चाहत्यांना होता. भारतीय गोलंदाजांनी टॉप ऑर्डरला ११ धावांच्या मोबदल्यात मैदानाबाहेरचा रस्ता दाखवला. त्यामुळे टीम इंडिया सामना जिंकणारच, असं चित्र होतं. मात्र दक्षिण आफ्रिकेच्या मिडल आणि लोअर ऑर्डरमधील फलंदाजांनी भारतीय गोलंदाजांची धुलाई केली. त्यामुळे सामना शेवटच्या ओव्हरपर्यंत गेला. मात्र अखेरच्या ओव्हरमध्ये टीम इंडियाने हा सामना जिंकला. कॉर्बिन बॉश याने अखेरच्या क्षणी फटकेबाजी केली. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेला शेवटच्या ओव्हरमध्ये १८ धावांची गरज होती. मात्र प्रसिध कृष्णा याने कॉर्बिन बॉश याला आऊट केलं. दक्षिण आफ्रिकेचं यासह पॅकअप झालं. भारतीय



गोलंदाजांनी दक्षिण आफ्रिकेला ४९.२ ओव्हरमध्ये ३३२ रन्सवर ऑलआऊट केलं. भारताने यासह हा सामना १७ धावांनी जिंकला. भारताने या विजयासह ३ सामन्यांच्या मालिकेत १-० ने आघाडी घेतली आहे. भारतीय वेगवान गोलंदाज आणि फिरकीपटूंसमोर दक्षिण आफ्रिकेच्या मॅथ्यू ब्रीट्झके, मार्को यान्सेन आणि कॉर्बिन बॉश यांनाच सामना करता आला. मॅथ्यूने ७२ धावा केल्या. तर यान्सेनने ७० धावांची खेळी करत दक्षिण आफ्रिकेच्या विजयाची आशा कायम राखली. तर कॉर्बिन बॉश याने टीम इंडियाला शेवटच्या ओव्हरपर्यंत तंगवलं. बॉशने दक्षिण आफ्रिकेला विजयाजवळ आणून ठेवलं होतं. मात्र प्रसिधने ५०व्या ओव्हरमधील दुसऱ्या बॉलवर बॉशला ६७ धावांवर रोहित शर्मा याच्या हाती कॅच आऊट केलं. भारताने यासह हा सामना आपल्या नावावर केला. तर टीम इंडियासाठी कुलदीप यादव याने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या. हर्षित राणा याने दक्षिण आफ्रिकेच्या ३ फलंदाजांना मैदानाबाहेरचा रस्ता दाखवला. अर्शदीप सिंह याने २ विकेट्स मिळवल्या. तर प्रसिधने एकमेव मात्र निर्णायक विकेट घेत भारताला विजयी केलं. रोहित शर्मा आणि यशस्वी जैस्वाल ही सलामी जोडी टॉस गमावून बॅटिंगसाठी आली. भारताने २५ धावांवर यशस्वीच्या रुपात पहिली विकेट गमावली. यशस्वी १८ धावांवर आऊट झाला. त्यानंतर रोहित आणि विराट कोहली या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी शतकी भागीदारी केली. रोहित-विराटने दुसऱ्या विकेटसाठी १०९ बॉलमध्ये १३६ रन्सची पार्टनरशीप केली. त्यानंतर रोहित ५७ रन्सवर आऊट झाला. ऋतुराज गायकवाड ८ आणि वॉशिंग्टन सुंदर १३ धावांवर बाद झाले. त्यामुळे भारताची १ आऊट १६१ वरुन ४ बाद २०० अशी स्थिती झाली. त्यानंतर केएल राहुल आणि विराटने टीम इंडियाला २७६ धावांपर्यंत पोहचवलं. विराटच्या रुपात भारताने पाचवी विकेट गमावली. विराटने १३५ धावा केल्या. विराट आऊट झाल्यानंतर केएल आणि रवींद्र जडेजा या दोघांनी टीम इंडियाला ३४१ धावांपर्यंत पोहचवलं. त्यानंतर केएल राहुल ६० धावांवर बाद झाला. रवींद्र जडेजा याने ३२ रन्स केल्या. तर अर्शदीप सिंह झिरोवर आऊट झाला.

# महिन्यातून किती वेळा बिअर प्यावी? नशा किती तास टिकते?

**वृत्तसंस्था :** भारतात बिअर पिणाऱ्यांची संख्या मोठी आहे. अनेजकण दररोजण बिअरचे सेवन करतात तर काहीजण पार्ट्यांमध्ये वीकेंडला किंवा रिलॅक्स होण्यासाठी बिअर पितात. बिअर ही दारूपेक्षा थोडी सौम्य असते, म्हणजे यात अल्कोहोलचे प्रमाण खूप कमी असते. असं असलं तरी याचे मर्यादेपेक्षा जास्त सेवन करणे धोकादायक ठरू शकते. कारण बिअर पिल्याने आरोग्यावर आणि शरीरावरही परिणाम होतो. त्यामुळे योग्य प्रमाणात बिअर पिणे गरजेचे आहे. आज आपण एका दिवसात किती बिअर प्यावी? बिअरची नशा किती तास राहते अशी प्रश्नांची उत्तरे जाणून घेऊयात. महिन्यातून किती वेळा बिअर प्यावी याचे काही ठरलेले प्रमाण नाही. जर तुम्ही निरोगी असाल तर तुम्ही महिन्यातून २-४ वेळा



मर्यादित प्रमाणात बिअर पिऊ शकता. मात्र यासाठी काही नियमांचे पालन करावे. पुरुषांनी दिवसातून ६५० मिली म्हणजे अंदाजे २ ग्लास पेक्षा जास्त बिअर पिऊ नये. तर महिलांनी दिवसातून ३३० मिली म्हणजे अंदाजे १ ग्लासापेक्षा जास्त बिअर पिऊ नये. दररोज बिअर पिल्याने वजन वाढू शकते आणि झोपेवर परिणाम होऊ शकतो. तुम्ही तुरळक प्रमाणात बिअर पित असाल तर हलक्या आणि कमी कॅलरी असलेली बिअर पिणे फायदेशीर ठरेल. कारण त्यात अल्कोहोलचे प्रमाण कमी असते, ज्यामुळे शरीराचे कमी प्रमाणात नुकसान होते. कोणत्या ऋतूत बिअर प्यावी? असाही अनेकांना प्रश्न पडतो. बिअर कोणत्याही ऋतूत पिता येते, मात्र उन्हाळ्यात थंड बिअर पिल्यास ताजेतवानेपणा येतो. एका बिअर पिले की ती नशा २ ते ४ तासांपर्यंत असते. मात्र आपण किती प्रमाणात बिअर पिलो? शरीराचे वजन किती आहे? बिअर रिकाम्या पोटी घेतली की अन्नासोबत? यावर बिअरची नशी किती तास टिकते हे अवलंबून आहे. महिलांनी गर्भधारणेदरम्यान किंवा स्तनपान करताना बअरचे सेवन करू नये. तसेच तुम्हाला यकृत, मूत्रपिंड किंवा हृदयरोग असेल तरीही बिअर पिऊ नये. रिकाम्या पोटी किंवा तुम्ही औषधे घेत असाल तरीही बिअरचे सेवन करू नये. तसेच वाहन किंवा एखादे यंत्र चालवण्यापूर्वी बिअरचे सेवन करू नये.

# सीसीटीव्ही फुटेजने उघडला हत्येचा कट; घाटकोपर हत्याकांडाने सोसायटीत भीतीचं सावट

**मुंबई (विशेष प्रतिनिधी) :** परिसरात बुधवारी सायंकाळी घडलेल्या एका धक्कादायक प्रकरणाने स्थानिकांत चिंतेचे वातावरण निर्माण झाले. हिमालय सोसायटीमधील ६५ वर्षीय शहनाज काझी या महिलांचा मृतदेह त्यांच्या घरात आढळला. सुरुवातीला मृत्यूचा प्रकार अस्पष्ट असला तरी पोलिस तपासात हा स्पष्टपणे खून असल्याचे उघडकीस आले. या प्रकरणी पोलिसांनी मृत महिलेची सून मुमताज इरफान खान (वय ५०) हिला अटक केली असून, तिनेच सासूची हत्या केल्याची कबुली दिली आहे. बुधवारी सायंकाळी शहनाज यांच्या बहिणीने त्यांना फोन करण्याचा प्रयत्न केला. वारंवार कॉल करूनही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे शंका आल्याने त्यांनी शेजारी राहणाऱ्या सायका अन्सारी यांच्याशी संपर्क साधला. सायका लगेच शहनाज यांच्या घरासमोर गेल्या. त्यांनी बराच वेळ दरवाजा ठोठावला, आवाज दिला, मात्र कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. ही बाब सायकाने पुन्हा त्यांच्या बहिणींना कळवली. परिसरातील एका महिलोकडे शहनाज यांच्या घराची



दुसरी चावी असल्याची माहिती समोर आल्यानंतर शहनाज यांच्या बहिणींनी सायकाला ती चावी घेऊन आत काय परिस्थिती आहे ते पाहण्यास सांगितले. सायका यांनी घर उघडल्यानंतर त्यांना आत भीषण दृश्य दिसले शहनाज या घरातच रक्ताच्या थारोळयात पडलेल्या होत्या. लगेच सोसायटीतील सदस्य जमले आणि पोलिसांना याची माहिती देण्यात आली. घाटकोपर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेण्यात आला. शवविच्छेदन अहवालात शहनाज यांच्या डोक्यावर गंभीर मारहाण झाल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर हा मृत्यू अपघाती नसून थेट खून असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे पोलिसांनी तात्काळ हत्या प्रकरणाचा गुन्हा दाखल केला आणि तपासासाठी वेगवेगळी दहा पथके तयार केली. या पथकांनी सोसायटीच्या आसपासचे सीसीटीव्ही फुटेज तपासायला सुरुवात केली. फुटेजमध्ये एका बुरखा घातलेल्या महिलेची संशयास्पद हालचाल आढळून आली. तिचा मागोवा घेत पोलिसांनी तपास वाढवला. अखेर ही महिला म्हणजेच शहनाज यांची सून मुमताज इरफान खान असल्याचे निष्पन्न झाले. तिला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आणि चौकशीत तिने गुन्ह्याची कबुली दिली. तपासात समोर आले की, शहनाज यांच्या नावावर मोठ्या प्रमाणात मालमत्ता होती. मात्र त्या कोणालाही ती देण्यास तयार नव्हत्या. याच कारणावरून सून मुमताजने मालमत्ता मिळवण्याचा कट रचला. मुमताज बुधवारीच सासूच्या घरी गेली, वाद घातला आणि रागाच्या भरात तिने त्यांच्या डोक्यावर वार करून त्यांची हत्या केली. गुन्हा लपवण्यासाठी तिने घरातील दागिनेही घेऊन पळ काढल्याचे पोलिसांनी सांगितले. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. वृद्ध महिलेची स्वतःच्या सूनेकडून हत्या झाल्याची बाब सर्वांना हादरवणारी ठरली आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास अधिक गतीने सुरू ठेवला असून पुढील काळात अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

# पंतनगरमधील दुकान फोडणाऱ्या दोघांना अटक

**मुंबई (विशेष प्रतिनिधी) :** घाटकोपर पूर्वेकडील पंतनगर भागातील पटेल चौकातील मोबाईल दुकान फोडून तब्बल ३ लाख ३२ हजार ३७० रुपये किंमतीचे चोरलेले सर्व मोबाईल पोलिसांनी जप्त केले आहेत. या गुन्ह्यात हितेश छोटलाल सोलंकी आणि मोहम्मद फिरोज नईम खान अशी त्यांची नावे आहेत. यातील सोलंकी हा मुख्य आरोपी असून, त्याच्यावर पुणे भागात अशा प्रकारचे गुन्हे दाखल आहेत अशी माहिती देण्यात आली. गेल्या १६ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री २ ते ३ वाजण्याच्या सुमारास घाटकोपर पूर्वेकडील पटेल चौकातील भानुशाली मोबाईल शॉपी या दुकानाच्या मागील बाजूस असलेल्या भिंतीच्या विटा काढून आत घुसून छतावरील पत्रे फोडून दुकानातील ३ लाख ३२ हजार ३७० किंमतीचे मोबाईल या आरोपींनी चोरुन नेले होते. याबाबत पंतनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक लता सुतार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी गांर्भीर्याने दखल घेवून घटनास्थळावरील तसेच या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यातून मोबाईल दुकानात प्रवेश करुन चोरी करणारा आरोपी व सोबत असलेला त्याचा साथीदार या दोघांनी दुकानातील मोबाईल चोरी केल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर आरोपीनी पोलिसांना गुंगारा देण्यासाठी घाटकोपर पूर्व येथून टॅक्सीने सायन रेल्वे स्थानकापर्यंत प्रवास केला. त्यानंतर सायन रेल्वे स्थानकाबाहेर त्यांनी दुसरी टॅक्सी पकडून सायन ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसपर्यंत प्रवास करुन, पुन्हा टॅक्सी बदलून नवी मुंबई दिशेने जात असताना फुटेजमध्ये दिसून आले. त्यामुळे पोलिसांनी तपासातून पडताळण्यात आलेल्या सी.सी.टी.व्ही फुटेज व तांत्रिक तपासाद्वारे अखेर एका आरोपीला पुण्यातील भोसरी, पिंपरी चिंचवड, पुणे येथून तर दुसऱ्या आरोपीला बेलापूर सेक्टर ११ मधील सी व्हीव नावाच्या डॉरमेंटरी मधून ताब्यात घेतले. तपासात आरोपीतांकडून ३, लाख ३२ हजार ३७० रुपये किंमतीचे १५ मोबाईल हस्तगत करण्यात आले. आरोपींना आता न्यायालयीन कोठडी मंजुर झाली आहे अशी माहिती लता सुतार यांनी दिली. दरम्यान, यातील आरोपी हितेश छोटेलाल सोलंकी हा पुणे जिल्हयातील चर्तुश्रृंगी तसेच आळंदी पोलीस ठाणे येथील २०२१ व २०२३ या वर्षात दाखल असणा-या फसवणूकीच्या गुन्हयात फरार असून, त्याला त्या पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात येणार आहे. ही कामगिरी परिमंडळ 7 चे पोलीस उपआयुक्त राकेश ओला, सहाय्यक पोलीस आयुक्त शैलेश पासलवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक लता सुतार यांच्या सूचनेनुसार निरीक्षक (गुन्हे) अजित गोंधळी यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी संतोष जाधव, गायकवाड, माने, आंब्रे, रोकडे यांनी पार पाडली. तर परिमंडळ -७ कार्यालयातील महिला पोलीस रुपाली हडवळे यांनी विशेष तांत्रिक सहाय्य केले.

# महाडमध्ये वृद्ध महिलेच्या हत्येने खळबळ!; २४ तासांच्या आत गुन्ह्याचा छडा लावण्यात पोलिसांना यश!!

**रायगड (विशेष प्रतिनिधी) :** महाड तालुक्यातील नाते येथे ७५ वर्षीय लीलावती राजाराम बलकवडे यांची शेतातील वाड्यावर हत्या करून सोन्याचे दागिने व मोबाईल लंपास केल्याच्या प्रकरणाने महाड तालुक्यात एकच खळबळ उडाली होती,मात्र उत्कृष्ट कामगिरी करीत पोलिसांनी अवघ्या २४ तासांच्या आत या गुन्ह्याचा छडा लावीत आरोपीला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवार २८ नोव्हेंबर २०२५ रोजी



दुपारी लीलावती बलकवडे आपल्या शेतातील वाड्यावर गेल्या असताना त्यांचा एकटेपणाचा फायदा घेत कोणा अज्ञात व्यक्तीने गळा दाबून हत्या करून त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने तसेच मोबाईल फोन घेत पळ काढला होता.घटनेची माहिती मिळताच महाड शहर पोलिसांनी तपासाची चक्र वेगाने फिरवली अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, महाड तालुका उपविभागीय पोलिस अधिकारी शंकर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक रमेश तडवी आणि त्यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण व स्थानिक पातळीवरील माहितीच्या आधारे संशयिताचा शोध घेतला. आणि अभिजीत महेश अंबावले (वय २४, रा. नाते, महाड या आरोपीस २४ तासांच्या आत ताब्यात घेत या प्रकरणाचा पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), १०९(४), ३११ नुसार गुन्हा नोंद झाला असून पुढील तपास सुरू आहे. या हत्येच्या घटनेने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते, मात्र पोलिसांनी अल्पावधीतच आरोपीला पकडल्यामुळे परिसरातील ग्रामस्थांनी पोलिसांच्या कृतीचे कौतुक केले आहे.

# ऑनलाईन डेटिंग ॲपच ‘हनिट्रॅप’ रॅकेट उधळले

**विरार (विशेष प्रतिनिधी ) :** ऑनलाईन डेटिंग ॲपवर मैत्री करून तरुणांना जाळयात ओढून लुटणाऱ्या दोघा महिलांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. विशेष म्हणजे डेटिंग ॲपवर ‘हॅपन’मार्फत मैत्री करून तरुणांना लुटण्याची शक्कल या महिला लढवत होत्या. एका ३१ वर्षीय तरुणाची एका मुलीसोबत ऑनलाईन ओळख झाली. दोघे २२ नोव्हेंबरला रात्री मांडवीतील एका लॉजवर भेटले. पण ‘डेट’ला तिसरी मुलगीही सोबत आली. तिघे मिळून मद्यप्राशन करत असताना तरुणाला अचानक प्रचंड झोप आली आणि तो बेशुद्ध झाला.सकाळी जाग आली, तर गळयातील २ तोळयांची



सोन्याची चेन मोबाईल फोन स्मार्ट वॉच अशी तब्बल १,८३,००० ची मालमत्ता गायब झाल्याचे आढळून आले. या प्रकरणी तरुणाने संबधीत महिलांविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. व गुन्ह्याचा तपास सुरू झाला. मात्र लुटारू महिलांनी गुन्हा केल्यानंतर डेटिंग ॲपवरील सर्व प्रोफाईल,लॉजवर फेक आयडी ,फेक नंबर तसेच कोणताही ऑनलाईन व्यवहार नाही आदी गोष्टींद्वारे स्वतःची ओळख लपवण्याचा प्रयत्न केला होता. दरम्यान पोलिसांनी हार न मानता सलग तपास सुरू ठेवला. दुसऱ्या दिवशी पुन्हा संबधीत महिलांनी दुसऱ्या तरुणाला जाळयात ओढत लुटले. याबाबत काशिमिरा पोलिसातही गुन्हा नोंद झाला होता. आता महिलांना शोधून काढण्याचे पोलिसांपुढे खरे आव्हान होते. मात्र कुठलाही ठोस पुरावा नसताना मांडवी पोलीस टीमने लॉजचे अंधुक सीसीटीव्ही फुटेज आजूबाजूच्या भागातील तांत्रिक विश्लेषण यांच्या आधारे संशयितांची ओळख पटवली. केवळ ४८ तासांत मुंबईच्या मालाड परिसरातून मांडवी गुन्हे प्रकटीकरण पथकाने दोघींना ताब्यात घेतलं. तसेच त्यांच्याकडून ४ लाख १३ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. या प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

# एसी लोकलचा बनावट पास बनविणाऱ्या दांम्पत्याला अटक

**कल्याण (विशेष प्रतिनिधी) :** आधुनिक तंत्रज्ञानाचा गैरवापर करून रेल्वे पास बनविण्याचा प्रयत्न एका उच्चशिक्षित दाम्पत्याला चांगलाच महागात पडला आहे. तंत्रज्ञानाचच्या मदतीने बनावट एसी लोकल पास तयार करून प्रवास करणाऱ्या अंबरनाथमधील पती-पत्नीला कल्याण रेल्वे पोलिसांनी अटक केली आहे. कल्याण स्थानकातील एसी लोकलमधील तपासणीदरम्यान हि घटना समोर आली. एका महिला प्रवाशाला तिकीट तपासणीदरम्यान विशाल




नवले नामक टीसीने पास दाखविण्यास सांगितले. तिने रेल्वेच्या यूटीएस ॲपमधील स्क्रीन दाखवली, मात्र तो पास संशयास्पद वाटल्याने टीसीने तत्काळ रेल्वे हेल्पलाईनवर कॉल करून त्या पासची पडताळणी केली. तपासात धक्कादायक बाब समोर आली पास ओम शर्मा या व्यक्तीचा असून, तो जानेवारी महिन्यात जारी केलेला आणि फेब्रुवारीमध्येच कालबाह्य झालेला होता. महिलेने स्वतःचे नाव गुडिया शर्मा असल्याचे सांगितल्याने टीसीचा संशय अधिक गडद झाला. डोंबिवली स्थानकात तिला उतरवून आरपीएफ कार्यालयात चौकशी करण्यात आली. तेव्हा खरा खुलासा झाला तिच्या पतीने स्वतःच्या एसी लोकल पासवर तंत्रज्ञानाच्या सहाय्याने एडिट करून त्यावर पत्नीचे नाव व तपशील टाकत बनावट पास तयार केल्याचे मान्य केले. दोघांवर रेल्वे पोलीस स्थानकात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# एक कोटी साठ लाख रुपयाची गोवा बनावटीची दारू महाड तालुक्यात जप्त !!

**महाड (विशेष प्रतिनिधी) :** दारूबंदी भरारी पथक मुंबई यांना मिळालेल्या माहितीप्रमाणे या अधिकाऱ्याने महाड तालुक्यातील मुंबई गोवा महामार्गावर सापळा रचून तालुक्यातील दासगाव हद्दीत गावातील एका ट्रकला थांबून कसून चौकशी करत त्या ट्रकमध्ये एक कोटी साठ लाख रुपयाची विनापरवाना गोव्यातील दारू जप्त केली आहे. मुंबई गोवा महामार्गावर मागील काही दिवसात दारूबंदी विभागाकडून करण्यात आलेली सर्वात मोठी कारवाई मानण्यात येत आहे.दारूबंदी विभाग भरारी पथक मुंबई यांना गोवा ते मुंबई विना परवाना दारू घेऊन एक ट्रक जाणार आहे अशी गुप्त माहिती मिळाली या माहितीच्या आधारावर यांनी महाड तालुका हद्दीत मुंबई गोवा महामार्गावर सापळा रचला आणि



आर जी -३६ जी बी १२७७ या ट्रकचा महाड वरून पाठलाग करत मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर दासगाव गाव हद्दीत थांबवून कसून चौकशी केली असता या ट्रकमध्ये अंदाजे १३०० रॉयल सिलेक्ट या दारूचे बॉक्स सापडले. या ट्रकचा चालकाला ट्रक सह ताब्यात घेण्यात आले असून महाड मधील दारूबंदी कार्यालय येथे पुढील कारवाईसाठी नेण्यात आले असल्याची माहिती या भरारी पथकाचे उपनिरीक्षक शहाजी गायकवाड यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी दिली आहे. गोवा राज्यातून हा ट्रक मुंबई येथे जात असल्याची माहिती भरारी पथकाचे उपनिरीक्षक शहाजी गायकवाड यांनी दिली असून महाड परिसरातील ही त्यांची पहिली तर या वर्षातील दुसरी कारवाई असल्याचे त्यांनी नमूद केले. या कारवाईमध्ये भरारी पथकाचे पोलीस उप निरीक्षक शहाजी गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक संतोष गोंदकर, पोलीस कॉन्स्टेबल अमोल चिलघर, पोलीस कॉन्स्टेबल चौगुले यांचा समावेश आहे. हा ट्रक ताब्यात घेतल्यानंतर दारूबंदी कार्यालय महाड या ठिकाणी नेण्यात आले आहे त्या ठिकाणी संपूर्ण तपासणी नंतर या ट्रक मध्ये दारूचे खोके नक्की किती आहेत आणि याची किंमत किती आहे हे निश्चित होईल. मागील काही महिन्यात दारूबंदी विभागाकडून महाड परिसरामध्ये करण्यात आलेली सर्वात मोठी कारवाई मानण्यात येत आहे. संबंधित चालक व अन्य इसमांना आज महाड न्यायालयात हजर करण्यात येईल अशी माहिती उपनिरीक्षक शहाजी गायकवाड यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना दिली.



## बेवारस मृतदेह

खेरवाडी पोलीस ठाणे, मुंबई अपमृत्यु नोंद क्र. ३८/२०२५ कलम- १९४ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) २०२३ अन्वये बेवारस महिला नामे सोनी शर्मा वय अंदाजे- ४५ वर्षे, रंग- गोरा, बांधा- सडपातळ, उंची- अंदाजे ५ फूट, केस काळे-पांढरे, उजव्या हातावर R.K.S. असे गोंदलेले असलेली महिला खेरवाडी पोलीस ठाणे, मुंबई हद्दीमध्ये बेशुद्धावस्थेत मिळून आली असून उपचाराकामी सायन रुग्णालयात दाखल केले असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी तपासून दाखलपूर्व मयत घोषीत केले. नमूद महिलेच्या नातेवाईकांचा शोध घेणे सुरू आहे तरी कोणी ओळखत असल्यास खालील नंबरवर संपर्क करावा.

**श्री.विजय बडे,**
**पोलीस उपनिरीक्षक**
**खेरवाडी पोलीस ठाणे, मुंबई**
**मोबाईल क्र : ८९७५२४५९००**
**पोलीस ठाणे क्रमांक : ८९७६९४७९७४**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,**
**आरे गोरेगाव,(पूर्व),मुंबई -४०००६५.**

**ई-निविदा सूचना क्रमांक २४ सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियता, सा.बा. विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई - ४०० ०६५ **योग्य कंत्राटदारांकडून अनु.क्र.१ करीता व नोंदणीकृत कंत्राटदार वर्ग-४ सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून अनु.क्र.२** खालील कामाकरीता ब -१ नमुन्यातील निविदा ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कोणतेही कारण न देता सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | मौजे गोरेगाव येथील साई बांगोडा येथे रॉयल पाल्मच्या भिंतीच्या शेवटापासून पुढे साखळी क्र. ०.०० ते साखळी क्र. ३००.००, साखळी क्र. ३००.० ते साखळी क्र. ६००.००, साखळी क्र. ६००.० ते साखळी क्र. ९००.०० मीटर येथे सलोह सीमेंट कॉक्रिंटची संरक्षण भिंत बांधणे. | रु.२,०२,८५,६३१.०० |
| २. | मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, गोरेगाव संकुल मुंबई येथे पश्चिम द्रुतगती महामार्गाला समांतर संरक्षण भिंत बांधणे. | रु.१,४५,७५,४४१.०० |

**ई - निविदा वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १. | निविदा डाऊनलोड करण्यांचा कालावधी | दिनांक **२७/११/२०२५** @ १५.०० पासून दिनांक **०४/१२/२०२५** @ १५.०० पर्यंत. |
| २. | प्री-बीड मिटींग | दिनांक **०१/१२/२०२५** रोजी **१५.००** वाजता अधीक्षक अभियंता, मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर,मुंबई-४०००७१ यांचे कार्यालय |
| ३. | निविदा उघडण्याचे ठिकाण दिनांक व वेळ (शक्य झाल्यास) | दिनांक **०५/११२/२०२५** @ १५.१५ वाजता (शक्य झाल्यास) अधीक्षक अभियंता, मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर,मुंबई-४०००७१ यांचे कार्यालय |

खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. https://mahapwd.com
२. https://mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यांत येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई-४०००६५. कार्यालयातील सूचना फलक.

**जा. क्र. साबांविप्र-आरे/नि.लि./ 2390**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,**
**आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई ४०००६५.**
**दुरध्वनी क्रं. ०२२-२९२७२४४७**
**दिनांक:- २८/११/२०२५**

**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,**
**आरे, गोरेगाव, पूर्व, मुंबई-४०००६५.**

आरओसी - 2025-26/क्र- 5/C४२१९

# कामाच्या ठिकाणी 'लैंगिक छळ' समिती अनिवार्य; स्थापन न करणाऱ्या कार्यालयांना ५० हजार दंड

**मुंबई (राकेश गायकवाड) :** महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी सर्व सरकारी विभाग, निमशासकीय संस्था तसेच खासगी आस्थापनांनी 'पोश' (प्रिव्हेशन ऑफ सेक्शुअल हॅरसमेंट) कायद्याची अंमलबजावणी करणे बंधनकारक असून सर्व आस्थापनांनी अंतर्गत समिती गठीत करावी अन्यथा आस्थापना प्रमुखास ५० हजाराचा दंड होईल, असा इशारा महिला व बालविकास आयुक्त नयना गुंडे यांनी दिला आहे. ज्या कार्यालये किंवा आस्थापनांमध्ये १० किंवा त्याहून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत, त्यांनी अंतर्गत समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. राज्यातील शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, स्थानिक



स्वराज्य संस्था, शासकिय कंपनी, नगरपरिषद, तसेच शासन अथवा स्थानिक प्राधिकरणाकडून निधी प्राप्त करणाऱ्या सर्व संस्थांमध्ये अंतर्गत समिती स्थापन करायची आहे. त्याचप्रमाणे खासगी कंपन्या, उद्योग, सेवा पुरवठादार संस्था, शैक्षणिक संस्था, रुग्णालये, मनोरंजन क्षेत्रातील संस्था, क्रीडा संघटना, क्रीडा संकुल आदी खासगी आस्थापनांनाही हा नियम लागू आहे. कायद्याप्रमाणे तरतुदींचे पालन न केल्यास संबंधित आस्थापना प्रमुखास कलम २६ नुसार ५० हजार रूपयांपर्यंत दंड तसेच, उल्लंघनाची पुनरावृत्ती झाल्यास दंड दुपटीने वाढविणे, आस्थापनेचा परवाना रद्द करणे किंवा अन्य कठोर कारवाई करण्याची तरतूद आहे. तसेच अंतर्गत समितीची माहिती केंद्र सरकारच्या शी बॉक्स पोर्टलवर अद्ययावत करायची आहे. ज्या कार्यालये किंवा आस्थापनांना भेट देतील, त्या ठिकाणी अंतर्गत समितीचा फलक प्रदर्शित नसेल, तर त्याबाबत तक्रार १८१ या महिला हेल्पलाईनवर तक्रार करावी. असे आवाहनही आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे. एका बाजूला देशातील खासगी कंपन्या, विद्यापीठे, स्वयंसेवी संस्था, माध्यमसंस्था (मिडिया) तसेच मैदानावर खेळणाऱ्या महिला खेळाडू आणि क्रीडा संस्थांना देखील पोश कायदा लागू आहे. असे असताना लाखो महिला कार्यकर्त्यांचा समावेश असणाऱ्या राजकीय पक्षांना मात्र हा कायदा बंधनकारक नाही. राजकीय पक्षांना 'कामाचे ठिकाण' किंवा 'कार्यालय' म्हणून बघता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाचे म्हणणे आहे.

### 'पोश' कायदा काय आहे?

कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) कायदा, २०१३ होय, ज्याचा उद्देश कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण करणे आणि सुरक्षित वातावरण देणे आहे. या कायद्यानुसार, प्रत्येक संस्थेने अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे आणि लैंगिक छळाच्या तक्रारी हाताळण्यासाठी एक सुरक्षित यंत्रणा असणे अनिवार्य आहे.

# पश्चिम रेल्वेचा मोठा निर्णय! नवीन वर्षाच्या अखेरपर्यन्त १५ डब्यांची लोकल येणार विरारकरांच्या सेवेत

**पालघर (सचिन कदम) :** मुंबई उपनगरीय प्रवाशांसाठी ही महत्त्वाची बातमी आहे. पश्चिम रेल्वेने प्रवाशांच्या सोयीसाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे आणि पहिल्यांदाच विरार ते डहाणू दरम्यान १५ डब्यांची लोकल ट्रेन चालवण्याची योजना आखली आहे. या मार्गावरील वाढती लोकसंख्या आणि प्रवासाची मागणी लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. ऑपरेटिंग विभागाने सध्या याबाबत बोर्डाला पत्र पाठवल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. जर पत्र मंजूर झाले तर विरार ते डहाणू दरम्यान धावणारी १२ डब्यांची लोकल ट्रेन १५ डब्यांची लोकल धावणार. मिळालेल्या माहितीनुसार, सुरुवातीला १५ डब्यांसह एकूण ६ लोकल सेवा चालवल्या जातील. सध्या या मार्गावर १२ डब्यांच्या



लोकल ट्रेन धावतात, ज्या मंजुरीनंतर १५ डब्यांच्या लोकल ट्रेनने बदलल्या जातील. सध्या विरार आणि डहाणू रोड दरम्यान ४० सेवा चालवल्या जातील. रेल्वे अधिकाऱ्यांचा असा विश्वास आहे की डहाणू-विरार पट्ट्यात जलद लोकसंख्या आणि औद्योगिक वाढीमुळे रेल्वेची गर्दी वाढत आहे, विशेषतः गर्दीच्या वेळी. प्रवाशांना मोठ्या प्रमाणात गैरसोयीचा सामना करावा लागतो. १५ डब्यांच्या लोकल ट्रेन सुरू केल्याने क्षमता अंदाजे २० ते २५ टक्क्यांनी वाढेल, ज्यामुळे प्रवाशांना त्यांच्या प्रवासादरम्यान अधिक जागा आणि आराम मिळेल. पालघर आणि डहाणू मार्गावर मोठ्या संख्येने प्रवासी पर्यटन स्थळे पाहण्यासाठी आणि आठवड्याच्या शेवटी सुट्टीसाठी प्रवास करतात. १५ डब्यांची ही सेवा स्थानिक पर्यटनाला चालना देईल आणि सामान्य प्रवाशांना लक्षणीय दिलासा देईल.

### पुणे पोलीसांची मोठी कामगिरी

# चोरी झालेले तब्बल ४०० मोबाईल मूळ मालकांना केले परत

**पुणे (अभिजीत येरल्लू) :** पोलिसांनी एकाचवेळी तब्बल ४०० मोबाईल नागरिकांना परत मिळून दिले आहेत. परिमंडळ एक आणि चारमधील गहाळ झालेले तसेच हरवलेले मोबाईल परत करण्यात आले आहेत. पोलिसांनी केलेल्या या कामगिरीने नागरिकांनी समाधान व्यक्त करत पोलिसांचे आभार मानले आहेत. पोलिसांच्या सायबर आणि स्थानिक गुन्हे शोध पथकाने संयुक्तपणे केलेल्या तपासातून हे मोबाईल परत करण्यात आले आहेत. शहरात मोबाईल चोरीला जाण्याच्या घटना हजारोंमध्ये आहेत. पण, त्याची अनेकवेळा नोंद होत नाही. पोलिस देखील मिसींग दाखल करण्यास सांगतात. नागरिकांकडून सीईआयआर या पोर्टलवर हरवल्याची नोंद केली जाते. त्यानूसार पोलिसांकडून या नोंद केलेल्या मोबाईलचा तांत्रिक शोध घेतला जातो. गेल्या काही महिन्यांमध्ये पोलिस अशा पद्धतीने हरवलेले मोबाईल शोधत असल्याचे दिसत आहे. त्यानुसार, परिमंडळ एक आणि चारमधील विविध पोलिस ठाण्याअंतर्गत नागरिकांनी "सीईआयआर" पोर्टलवर हरवलेल्या मोबाईलची नोंद केल्यानंतर त्याच्या आयएमईआय क्रमांकावरून शोधमोहीम राबविली. अनेक मोबाईल



महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांत तर काही मोबाईल वेगवेगळया राज्यांत कार्यरत असल्याचे समोर आले. लगेच त्या ठिकाणच्या पोलिसांशी संपर्क साधून मोबाईल परत मिळविले. विशेष उपक्रमात परिमंडळ एकचे उपायुक्त कृषिकेश रावले यांच्या हस्ते १९३ मोबाईल तसेच परिमंडळ चारमधील उपक्रमात अप्पर पोलिस आयुक्त मनोज पाटील, पोलिस उपायुक्त सोमय मुंडे यांच्या हस्ते २०६ मोबाईल तक्रारदारांना परत करण्यात आले. हरवलेला मोबाईल पुन्हा मिळाल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद दरवळत होता. नागरिकांनी पोलिसांचे मनापासून आभार मानले.

# मुंबईतील १६ भूखंडांचा ई-लिलाव; शाळा आणि रुग्णालयासाठी जागा उपलब्ध

**मुंबई (प्रथमेश चव्हाण) :** म्हाडाच्या मुंबई मंडळाने नुकतीच मुंबईतील विविध ठिकाणच्या ८४ भूखंडांच्या ई लिलावासाठी नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृतीला सुरुवात केली. यापाठोपाठ मुंबईतील विविध वापरासाठी राखीव असलेल्या १६ भूखंडांचा ई लिलाव करण्याचा निर्णय मुंबई मंडळाने घेतला असून त्याबाबतच्या जाहिरातीच्या तयारीला वेग देण्यात आला आहे. येत्या १५ दिवसांत यासाठी जाहिरात प्रसिद्ध केली जाण्याची शक्यता आहे. शाळा, रुग्णालय आणि इतर सुविधांसाठी राखीव भूखंडांचा यात समावेश आहे. या भूखंड विक्रीतून मंडळाला कोट्यवधी रुपयांच्या महसुलाची अपेक्षा आहे. म्हाडाच्या मालकीच्या भूखंडांपैकी काही भूखंड विविध सुविधा वापरासाठी



राखीव आहेत. या भूखंडांचा त्याच कारणासाठी वापर करणे बंधनकारक आहे. त्यानुसार त्या त्या मंडळाकडून असे भूखंड ई लिलावाद्वारे ८०-९० वर्षांसाठी भाडेतत्वावर दिले जातात. मुंबई मंडळाने अशाप्रकारच्या अनेक भूखंडांचा आतापर्यंत ई लिलाव केला. मंडळाने २०२४ मध्ये १७ भूखंडांच्या ई लिलावाची प्रक्रिया सुरू केली. काही कारणाने दोन भूखंड प्रक्रियेतून बाद करून १५ भूखंडांचा ई लिलाव करण्यात आला. या ई लिलावाला म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही. १५ पैकी ५ भूखंड विकले गेले. १० भूखंडांना प्रतिसाद मिळाला नसला तरी महत्त्वाची बाब म्हणजे जे पाच भूखंड विकले गेले त्यातूनच मुंबई मंडळाला २०० कोटी रुपये महसूल मिळाला. पाचही भूखंडांना चांगली, अपेक्षेपेक्षा अधिक बोली लागल्याने मंडळाला चांगला महसूल मिळाला. आता मागील ई लिलावात रिक्त राहिलेल्या १० भूखंडांसह नवीन ६ भूखंड अशा एकूण १६ भूखंडांचा ई लिलाव करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासंबंधीचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी म्हाडा उपाध्यक्षांकडे पाठविण्यात आल्याची माहिती मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. तर दुसरीकडे ई लिलावाच्या जाहिरातीची आणि इतर प्रक्रियेची तयारी सुरू आहे. उपाध्यक्षांच्या मान्यतेनंतर जाहिरात प्रसिद्ध करून नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृती आणि बोली लावण्याच्या प्रक्रियेस सुरुवात केली जाणार आहे. डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत या प्रक्रियेस सुरुवात होण्याची शक्यता आहे. मालवणी, कांदिवली, टागोरनगर (विक्रोळी), कन्नमवारनगर (विक्रोळी), जोगेश्वरी यासह अन्य ठिकाणच्या भूखंडांचा ई लिलावात समावेश असणार आहे. शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, मनोरंजन मैदाने अशा विविध वापरासाठी हे भूखंड आरक्षित असतील. २००० चौ. मीटरपासून ते ५००० चौ. मीटरच्या भूखंडांचा यात समावेश असण्याची शक्यता आहे. या भूखंडांची बोली किंमत लवकरच निश्चित केली जाणार आहे. ही किंमत निश्चित झाल्यानंतर मंडळाला या ई लिलावातून किती महसूल मिळणार हे स्पष्ट होईल. तर यावेळी भूखंडांच्या ई लिलावाला कसा प्रतिसाद मिळतो, सर्वच्या सर्व भूखंड विकले जातात का हे पाहणेही महत्त्वाचे आहे.

# सिम कार्डशिवाय WhatsApp, Telegram ला 'ब्रेक' – मोदी सरकारचा निर्णय

**नवी दिल्ली (प्रगती शर्मा) :** सोशल मीडिया आणि मेसेजिंग ॲप्स वापरणाऱ्या लाखो भारतीय वापरकर्त्यांसाठी केंद्र सरकारने एक अत्यंत महत्त्वाची आणि मोठी बातमी दिली आहे. देशातील सायबर सुरक्षितता अधिक बळकट करण्यासाठी, सरकारने व्हॉट्सॲप, टेलिग्राम, सिग्नल, स्नॅपचॅट इत्यादींसह सर्व लोकप्रिय मेसेजिंग आणि सोशल ॲप्ससाठी नवीन आणि कडक नियम लागू केले आहेत. दूरसंचार विभागच्या दूरसंचार सायबरसुरक्षा सुधारणा नियम, २०२५ अंतर्गत हे नवे निर्देश जारी करण्यात आले आहेत. या नवीन नियमांनुसार, कोणताही वापरकर्ता सक्रिय सिम कार्डशिवाय



किंवा केवळ वायफाय वापरून ही ॲप्स वापरू शकणार नाही. या नियमांमुळे ॲप्स वापरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे सक्रिय मोबाईल नंबरद्वारे प्रमाणीकरण करणे बंधनकारक होईल. परिणामी, सायबर गुन्हेगार किंवा दहशतवादी घटकांना अज्ञात राहून या ॲप्सचा गैरवापर करणे कठीण होईल. सरकारच्या या निर्णयामुळे वापरकर्त्यांची सुरक्षा अधिक वाढणार आहे. केंद्र सरकारने मेसेजिंग ॲप्सच्या सुरक्षिततेसाठी लागू केलेल्या नवीन नियमांनुसार, आता वापरकर्त्यांना सक्रिय सिम कार्ड ठेवणे बंधनकारक झाले आहे. या नवीन नियमांचे नेमके स्वरूप काय आहे, हे दूरसंचार विभागाने स्पष्ट केले आहे. नवीन नियमांनुसार, 'टेलिकम्युनिकेशन आयडेंटिफायर युजर एन्टीटीज' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मोबाईल ॲप कंपन्यांना वापरकर्त्याचे सिम कार्ड ९० दिवसांच्या सतत कालावधीसाठी डिव्हाइसशी जोडलेले आहे, याची खात्री करावी लागेल. या नियमांचे पालन न झाल्यास किंवा सिम कार्डमध्ये बदल झाल्यास मोठा परिणाम होईल. जर वापरकर्त्याने डिव्हाइसमधून सिम कार्ड काढून टाकले किंवा ते कोणत्याही कारणास्तव निष्क्रिय झाले, तर त्या डिव्हाइसमध्ये त्या ॲपला प्रवेश उपलब्ध राहणार नाही. या कडक नियमांमुळे, ॲप्सचा गैरवापर करणे किंवा बनावट खाती तयार करणे थांबेल आणि सायबर सुरक्षितता अधिक मजबूत होईल. केंद्र सरकारने मेसेजिंग ॲप्ससाठी नवीन आणि कडक नियम लागू केले असून, याचा थेट परिणाम वेब ब्राउझरवर व्हॉट्सॲप किंवा टेलिग्राम वापरणाऱ्या लाखो वापरकर्त्यांवर होणार आहे. सरकारने या वापरकर्त्यांसाठी सुरक्षिततेचा आणखी एक स्तर जोडला आहे. आता वेब वापरकर्त्यांना मेसेजिंग ॲप्स वापरणे अधिक सुरक्षित, पण थोडे त्रासदायक ठरू शकते. कारण, वापरकर्ता ॲपमध्ये प्रवेश करताच आपोआप लॉग आऊट होईल.

# "आरेतील झाडं कापल्यामुळेच प्रदूषण वाढलंय" – उद्धव ठाकरे

**मुंबई (विशाल कारंडे) :** राज्यात निवडणुकांचं वातावरण आहे. मुख्यमंत्री आणि त्यांचे दोन सहकारी आणि मंत्रिमंडळ हे प्रचारासाठी फिरतायत. गावागावात जाऊन मतं मागत आहेत. या गावपातळीवरच्या निवडणुका असून, यात पैशाचा धूर निघताना दिसतोय. सामनाच्या अग्रलेखातही याचा उल्लेख केलेला आहे. पैशाचं वाटप किंवा पैशाचा पाऊस किंवा अतिवृष्टी ही भयानक पद्धतीनं महाराष्ट्रात सुरू आहे. एक प्रकारचा सत्तेचा माज आणि दर्प राज्यकर्त्यांच्या वक्तव्यातून आणि वागणुकीतून महाराष्ट्र पाहतोय, असं म्हणत उद्धव ठाकरेंनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार हल्लाबोल केलाय. उद्धव ठाकरेंनी आज मातोश्रीवर पत्रकार परिषद घेतली त्यावेळी ते बोलत होते. मी आठ ते दहा दिवसांपूर्वी मराठवाड्यात शेतकऱ्यांमध्ये जाऊन बसलो होतो. मी त्यांच्या वेदना समजून घेण्याचा



प्रयत्न केला. त्यांना मी धीर दिला. त्याप्रमाणे एकही मंत्री शेतकऱ्यांमध्ये जाऊन बसत नाही. नागरिकांशी बोलत नाही. जिथे जातायत तिथे पैशाचा थैल्या उघडल्या जाताहेत आणि मतं मागितली जातायत. हे चित्र फार भयानक आहे, मी दोन विषय तुमच्यासमोर मांडणार आहे, त्यात एकूणच मुंबईमध्ये गेली दोन ते तीन वर्षं प्रदूषणाची पातळी मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. याही वर्षी आपण त्याचा अनुभव घेतोय. जे काही रिपोर्ट्स येतायत, त्यानुसार मुंबईची हवा आरोग्यासाठी घातक होत चाललेली आहे, असंही उद्धव ठाकरे यांनी सांगितलंय. राज्यकर्ते म्हणतील इथिओपियामध्ये ज्वालामुखीचा उद्रेक झाला, त्याचे ढग इकडे आलेत की काय? तर याचा आणि इथिओपियातील ज्वालामुखीचा काहीही संबंध नाही, हा इथे झालेल्या भ्रष्टाचाराच्या ज्वालामुखीचा उद्रेक आहे. त्यातून हे भ्रष्टाचाराच्या प्रदूषणाचे ढग हे मुंबई आणि महाराष्ट्रावरती गेरावतायत. मी जो विषय घेतलाय तो प्रदूषणाचा आहे. मी मुख्यमंत्री झालो असताना तत्काळ आरेमधल्या कारशेटडला स्थगिती दिली होती. याचा अर्थ मी मेट्रोला विरोध केलेला नव्हता. पण मेट्रोसाठी आरेऐवजी आणि कांजूरमार्गची जागा सुचवली होती. ती जागा आता या सरकारनं घेतलेली आहे आणि आरेची झाडं कापलेलीच आहेत, असंही उद्धव ठाकरेंनी अधोरेखित केलंय

# अदाणी पॉवरची मुंबईत धडक; धारावीत वीज वितरणासाठी परवाना अर्ज दाखल




**मुंबई (नितीन देवळेकर) :** मुंबईच्या पूर्व आणि पश्चिम उपनगरात विजेच्या पुरवठा करणाऱ्या अदाणी इलेक्ट्रिसिटीने आता धारावी आणि संलग्न क्षेत्रात विजेचा पुरवठा करता यावा म्हणून महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाकडे परवाना मागितला आहे. यावर जनसुनावणी होईल. धारावीमध्ये पूर्वीपासूनच बेस्ट आणि टाटा पॉवर विजेचा पुरवठा करत आहे. आयोगाने जर अदाणीला परवाना दिला तर धारावीकरांना विजेसाठी तिसरा पर्याय उपलब्ध होणार आहे. मुंबई शहराला बेस्टकडून विजेचा पुरवठा केला जातो. काही परिसरात टाटा पॉवरकडूनही वीजपुरवठा केला जातो. उपनगरात टाटा आणि अदाणीसह मुलुंड व भांडूपमध्ये महावितरणकडून वीजपुरवठा होतो. चार कंपन्यांच्या विजेच्या दराची तुलना केली तर बेस्टचे दर तुलनेने कमी आहेत. टाटा, अदाणी आणि महावितरणचे दर अधिक आहेत. आता अदानी इलेक्ट्रिसिटीने भौगोलिक संग्लन धारावी क्षेत्रात (माहीम नदी व तिवरांच्या जंगलासह व जलसाठीच्या क्षेत्रासहित) विजेचा पुरवठा करण्याचा परवाना मागितला आहे. कुणाला सूचना व हरकती दाखल करायच्या असतील तर आयोगाच्या संकेतस्थळावर अर्ज करता येईल. ज्यांना थेट आयोगाच्या कार्यालयात हरकती द्यायच्या असतील त्यांना २९ डिसेंबरपूर्वी अर्ज करावा लागेल. मुंबईत वीज पुरवठा करण्याचा परवाना महावितरणनेही वीज नियामक आयोगाकडे मागितला होता. मात्र याबाबत अद्याप सुनावणी झाली नाही, असे महावितरणच्या सूत्रांनी 'लोकमत'ला शनिवारी सांगितले. महावितरणचे मुंबईत वीज वितरण जाळे नसल्याने वीज पुरवठ्यासाठी पायाभूत सुविधा उभारणे हे प्रमुख आव्हान महावितरणपुढे असेल. बेस्ट, टाटा पॉवर व अदाणीच्या तुलनेत स्वस्त दराने वीज देऊ, असा दावा महावितरणने केला होता.

# पुणे दर्शन होणार अधिक रोमांचक; लवकरच सुरू होतेय ओपन गॅलरी बस



**पुणे (शकिल शेख) :** लवकरच लंडन आणि न्यूयॉर्कसारख्या आंतरराष्ट्रीय शहरांच्या धर्तीवर 'ओपन गॅलरी बस' सेवा सुरू होणार आहे. या नव्या उपक्रमामुळे पुण्यातील पर्यटनाला चालना मिळण्याबरोबरच पीएमपीच्या उत्पन्नातही वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पीएमपीचे अध्यक्ष पंकज देवरे यांनी ही संकल्पना पुढे आणली असून, या नव्या ओपन गॅलरी बसला 'मेक इन पीएमपीएमएल' असे नाव देण्यात आले आहे. या बसमधून प्रवाशांना पुण्यातील ऐतिहासिक वास्तू, जुन्या शैलीतील इमारती, सांस्कृतिक केंद्रे आणि शहराचे बदलते रूप जवळून पाहता येणार आहे. अनेक परदेशी शहरांत अशा बस पर्यटनाचा अनुभव दिला जातो. न्यूयॉर्क, लंडन यांसारख्या ठिकाणी या प्रकारच्या बस पर्यटकांमध्ये विशेष लोकप्रिय आहेत. त्याच धर्तीवर पीएमपीएमएलनेही पुण्यात अशी सेवा सुरू करण्याची तयारी सुरू केली आहे. शहरात फिरताना काही रस्त्यांवर विद्युत तारा अगदी खाली आल्याचे दिसतात, तर अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या बसच्या मार्गातच येतात. त्यामुळे ओपन गॅलरी बस चालवताना प्रवाशांच्या सुरक्षिततेचा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. यासाठी सेवा सुरू करण्यापूर्वी नियोजित मार्गाची पाहणी करून, आड येणाऱ्या फांद्या आणि तारा महापालिका व महावितरणच्या मदतीने हटवावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# माकडं पकडा, पैसे कमवा! राज्यातील माकड पकडणाऱ्याला मिळणार ६०० रुपये

**पुणे (अकिल शेख) :** राज्यात बिबट्याची दहशत वाढली असतांना आता अनेक भागात माकडांनी उच्छाद मांडलाय. पुण्यात एका सोसायटीत शिरलेल्या माकडांच्या टोळीनं रहिवाशांना सळो की पळो करुन सोडलंय. आता मानव माकडांच्या या संघर्षावर नियंत्रण मिळवण्यासाठी वनविभागानं अनोखी शक्कल लढवत माकडा पकडा आणि पैसे मिळवा ही योजना सुरु केलीये. मुंबईत जसं उंदिर पकडल्यावर कंत्राटी कामगारांना पैसे दिले जायचे तसंच आता माकडं पकडल्यावर वनविभागानं आपल्या कामाचं विकेंद्रीकरण करत जनतेलाच कामाला लावलंय. माकड बचावासाठी सुरक्षितपणे १० माकडं पकडल्यास आणि त्यांना सुरक्षित सोडल्यास प्रती माकड ६०० रुपये मिळणार आहेत १०



पेक्षा जास्त माकड जर पकडले तर प्रति माकड ३०० रुपये देण्यात येतील. यावेळी एकावेळी १० हजारांपेक्षा जास्त आर्थिक सहाय्य मिळणार नसल्याचं देखिल सांगण्यात आलंय. ५ माकडं पकडण्यासाठी प्रशिक्षित व्यक्तींना प्रवास खर्च मिळणार असून १ हजार रुपये प्रवासासाठी देण्यात येणारेयत. जास्त माकडं पकडले तरी वेगळा प्रवास खर्च मिळणार नाही. हे देखिल नमुद करण्यात आलंय. माकडांच्या नसबंदीचा प्रस्ताव हा गेल्या दोन अडिच वर्षांपासून धूळखात पडून आहे. त्यावर हालचाली करण्याऐवजी प्रशासनानं जनतेला कामाला लावलंय. माकडं पकडतांना आता तुम्हाला त्याचं व्हिडीओ रेकॉर्डींग देखिल करावं लागणारये. त्यामुळे वनविभागाला सहकार्य करुन माकडं पकडतांना आपलं माकड हाड मोडणार नाही ना? याची काळजी घ्या आणि खुशाल माकडं पकडा आणि पैसे कमवा.